POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१०५ ● मुंबई, सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### आता ईडीच्या रडारवर अल फलाह विद्यापीठ

डॉक्टरांनी स्फोटके खरेदी करण्यासाठी २३ लाख रुपये कुठून जमवले याची सक्तवसुली संचालनालय (ईडी) चौकशी करणार आहे. ईडी आता अल फलाह विद्यापीठाच्या व्यवहारांचीही चौकशी करेल. तसेच इतर तपास यंत्रणाही दहशतवादी निधीपुरवठा आणि पैशांचे झालेले व्यवहार शोधण्याचे काम करत आहेत. विद्यापीठाच्या खात्यांची आणि संबंधित संस्थांची तपासणी केल्यास दहशतवादी मॉड्यूलच्या निधीपुरवठ्याबाबत महत्त्वाचे धागेदोरे मिळू शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### काश्मिरात ५०० ठिकाणी छापे, ६०० जण ताब्यात

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाचे धागे जम्मू-काश्मीरपर्यंत पोहोचले असून जम्मू-काश्मीर पोलिसांनी आतापर्यंत ५०० ठिकाणी छापेमारी करून सुमारे ६०० जणांना ताब्यात घेतले आहे. श्रीनगर, कुलगाम, पुलवामा, शोपियां आणि बारामुला या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात छापेमारी करण्यात आली. या कारवाईदरम्यान तीन सरकारी कर्मचारी आणि इतर सात जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

# दहशतवाद्यांना बाबरीचा बदला घ्यायचा होता

## देशभरात ३२ कारमध्ये स्फोट घडवण्याचा होता कट... तपासातून माहिती उघड

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटानंतर नवनवीन माहिती उघडकीस येत आहे. १० नोव्हेंबरला स्फोट झाला, त्याआधी फरिदाबाद येथून २९०० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. दहशतवाद्यांना लाल किल्ला आणि इतर ठिकाणी स्फोट घडवायचे होते आणि ६ डिसेंबर १९९२ ला बाबरी मशीद पाडली गेली, त्याचा बदला घ्यायचा होता. ३२ कारमध्ये बॉम्ब आणि स्फोटके ठेवून देशभरात स्फोट घडवून आणण्याचा कट रचण्यात आला होता, अशी माहिती चौकशीतून समोर आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.




''१६ व्या शतकात बाबरी मशीद ही रामजन्मभूमीच्या जागेवर उभी राहिली आहे, असा दावा होत होता. या वादानंतर ६ डिसेंबर १९९२ ला बाबरी मशीद कारसेवकांनी पाडली. त्यानंतर झालेल्या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यात राम मंदिराच्या बाजूने निकाल लागला आणि २०२० मध्ये राम मंदिराचे काम सुरू झाले. बाबरी मशीद पाडली गेल्याचा बदला जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेला घ्यायचा होता. त्यामुळे त्यांनी दहशतवाद्यांचे 'व्हाईट कॉलर मॉड्यूल' उभे केले. या मॉड्यूलमध्ये डॉक्टर, प्रोफेसर आणि महिलांचा समावेश होता. डॉक्टरांचे हे मॉड्यूल दिल्लीत लाल किल्ल्यासह सहा ठिकाणी स्फोट घडवणार होते, अशीही माहिती समोर आली आहे,'' असे पोलिसांनी सांगितले.

'जैश-ए-मोहम्मद'चे दहशतवादी बाबरी प्रकरणाचा बदला घेण्याच्या तयारीत होते. स्फोट घडवून आणण्यासाठी डॉ. मुझम्मील, डॉ. आदिल, डॉ. उमर आणि डॉ. शाहीन यांनी ३० लाख रुपये जमवले होते. स्फोटके बनवण्यासाठी हरयाणातील नूह व गुरुग्राम येथून साहित्य जमा करण्यात आले. त्यानुसार ६ आणि ७ डिसेंबरला स्फोट घडवून आणायचे होते, अशा गोष्टींची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

**हरयाणामध्ये तिसरी संशयित कार सापडली**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ कार स्फोट घडवणारा दहशतवादी डॉ. उमर उन नबी याच्या मालकीच्या इको स्पोर्ट्स कारच्या फॉरेन्सिक चाचणीत काही सुगावे सापडले आहेत. त्यानुसार पोलिसांनी फरीदाबाद येथून या मॉड्यूलशी जोडलेली तिसरी ब्रिझा कार जप्त केली आहे. अल-फलाह विद्यापीठात जप्त करण्यात आलेली ही कार महिला दहशतवादी डॉ. शाहीनच्या नावावर असल्याची माहिती आहे. हरयाणा पोलिसांचे बॉम्बशोध पथक या कारची चौकशी करत आहे. या प्रकरणाशी संबंधित चौथ्या स्विफ्ट डिझायर कारचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.

**प्रत्येक काश्मीरी मुस्लीम हा दहशतवादी नाही -उमर अब्दुल्ला**

जम्मू-काश्मीरमधील प्रत्येक मुस्लीम व्यक्ती ही दहशतवादी नाही आणि प्रत्येक काश्मीरी मुसलमान दहशतवाद्यांच्या बाजूने नाही. या घटनेची जितका निषेध व्यक्त केला जाईल तितका तो कमी आहे. निरपराध लोकांची अशाप्रकारे निर्घृणपणे हत्या कोणत्याही धर्मात किंवा विचारसरणीत मान्य नाही. दोषींवर कठोर कारवाई व्हायलाच हवी, पण त्याचबरोबर निर्दोष लोकांना या कारवाईत ओढले जाऊ नये. दोषींना शिक्षा व्हायलाच हवी, पण निरपराधांना वाचवणे ही सरकारची जबाबदारी आहे, अशी प्रतिक्रिया जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी व्यक्त केली.

# दिल्ली स्फोट हा दहशतवादी हल्लाच! केंद्र सरकारने केले जाहीर



**■मुंबई। प्रतिनिधी,**

दिल्लीतील बॉम्बस्फोट हा दहशतवादी हल्लाच असल्याचे केंद्र सरकारने बुधवारी जाहीर केले. लाल किल्ल्याजवळ झालेल्या या दहशतवादी हल्ल्याबाबत बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक ठराव मंजूर करण्यात आला व या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. तसेच पीडितांना श्रद्धांजलीही अर्पण करण्यात आली. दरम्यान, दिल्ली बॉम्बस्फोटात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांकडे एक नाही तर दोन कार असल्याचा पोलिसांना संशय आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ठराव वाचून दाखवला की, मंत्रिमंडळाने या दहशतवादी घटनेचे वर्णन "राष्ट्रविरोधी शक्तींनी केलेले घृणास्पद कृत्य" असे केले आहे. याप्रकरणी तपास यंत्रणांना कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गुन्हेगार व त्यांच्या साथीदारांची ओळख पटावी आणि त्यांना शिक्षा होण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. तसेच दहशतवादाविरुद्ध सरकारचे शून्य-सहिष्णुतेचे धोरण आहे, असा इशाराही यावेळी देण्यात आला. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्रिमंडळाने दहशतवादाच्या सर्व स्वरूपांना कठोरपणे मोडून काढण्याचे जाहीर केले. राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षेबाबत असलेल्या आपल्या बांधिलकीनुसार सर्व भारतीयांच्या जीवन आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी सरकार ठाम आहे.

लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर चर्चा करायला पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल हे सहभागी झाले होते. या बैठकीत सुरक्षा यंत्रणांचा अहवाल व भविष्यातील रणनीतीवर चर्चा झाली.

**दुसरी फोर्ड इकोस्पोर्ट कार हरयाणात सापडली**

दिल्ली स्फोटात दहशतवाद्यांकडे एक नव्हे तर दोन कार होत्या. लाल रंगाच्या फोर्ड इकोस्पोर्ट कारचा क्रमांक डीएल१०-सीके-०४५८ हा होता. ही कार हरयाणाच्या खंदावली गावात सापडली आहे. ही कार डॉ. उमर उन नबी यांच्या नावाने नोंदणीकृत आहे.

# पंजाबमध्ये पोलिसांनी दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश

**■मुंबई। प्रतिनिधी,**

पंजाब पोलिसांनी लुधियानामध्ये आयएसआय-संचालित मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी परदेशी हँडलर्सच्या १० प्रमुख एजंटांना अटक केली आहे. आरोपी ग्रेनेड उचलण्यासाठी आणि पोहोचवण्यासाठी मलेशियातील तीन एजंटांमार्फत पाकिस्तानातील हँडलर्सच्या संपर्कात होते, असे तपासात समोर आले आहे, असे डीजीपी गौरव यादव यांनी सांगितले. प्राथमिक तपासात असे दिसून आले की, आरोपी हातबॉम्ब उचलण्यासाठी आणि पोहोचवण्यासाठी मलेशियातील तीन कार्यकर्त्यांमार्फत पाकिस्तानातील हँडलर्सच्या संपर्कात होते. राज्यात अशांतता निर्माण करण्यासाठी लोकवस्ती असलेल्या भागात ग्रेनेड हल्ला करण्याचे काम या दहशतवाद्यांना देण्यात आले होते. पोलिसांनी प्रारंभी तिघांना लुधियानाच्या बस्ती जोधेवाल येथून अटक केली होती. त्यांच्याकडून पोलिसांनी एक हातबॉम्ब जप्त करण्यात आला आहे. या तिन्ही आरोपींना अटक केल्यानंतर लुधियाना पोलिसांनी पुढील तपास केला. त्यानंतर काही इतर आरोपींची ओळख पटली. अटक केलेल्या आरोपींवर यूएपीए कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर विदेशातील आरोपींविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली आहे.







तज्ज्ञांच्या मते, महामार्गांवरील अपघातांचे मुख्य कारण म्हणजे कमकुवत रस्ते, रस्त्यावरील खड्डे, बेजबाबदारपणे वाहन चालवणे, चालकाचे अपुरे प्रशिक्षण आणि ओव्हरलोड वाहनांची वाहतूक. वाहतूक विभागाने अपघात कमी करण्यासाठी अनेक उपाय राबवले तरी, अपघातांचे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे, त्यामुळे नागरिकांनी वाहन चालवताना अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.

# महाराष्ट्रातील रस्ते की मृत्यूचा सापळा... ६ वर्षात अपघातात ९५,७२२ जणांनी गमावला जीव

**■मुंबई। प्रतिनिधी,**

पुण्यातील नवले पुलाजवळ गुरुवारी (दि. १३) भयंकर अपघात घडला. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता, की प्रवाशांना बाहेर पडायलाही वेळ मिळाला नाही. याआधी जळगाव येथे एक कार दुभाजकाला आदळल्याने गर्भवती महिलेचा गाडीतच जळून मृत्यू झाला. असे अपघात महाराष्ट्रात रोज घडत असतात.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात रस्ते अपघातांचे प्रमाण वाढले आहे. जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२५ या सहा वर्षात राज्यात तब्बल ९५,७२२ लोकांचा रस्ते अपघातांत मृत्यू झाला आहे. याच काळात २,१९,०३९ अपघात घडले असून ज्यात १,२९,६७० लोक गंभीर जखमी झाले आणि ५३,०३६ जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. हा आकडा फारच भयावह आहे. वाहतूक विभागाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत २६,९२२ अपघात घडले असून ११,५३२ लोकांचा मृत्यू झाला आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत २६,७१९ अपघातांमध्ये ११,५७३ जणांचा मृत्यू नोंदवण्यात आला होता. राष्ट्रीय पातळीवर, २०२३ मध्ये भारतात रस्ते अपघातांत १,७२,८९० लोकांचा मृत्यू झाला. त्यात १५,३६६ मृत्यूंसह महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता, तर तामिळनाडू पहिल्या आणि उत्तर प्रदेश दुसऱ्या क्रमांकावर होता. या सहा वर्षांमध्ये २०२० मध्ये रस्ते अपघातांची संख्या कमी झाली. कारण या काळात कोरोनाच्या साथीमुळे वाहतुकीवर निर्बंध होते. मात्र, नंतरचे आकडे सातत्याने वाढत आहेत. या वर्षी जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान वाशिम जिल्ह्यात अपघातांमध्ये ३७ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर धाराशिव (२७ टक्के), सोलापूर शहर (२६ टक्के) आणि सांगली (२५ टक्के) यांचा क्रमांक आहे. मृत्यूच्या दृष्टीने बुलढाणा जिल्ह्यात ५९ टक्के वाढ झाली आहे. सांगली (५४ टक्के), सोलापूर शहर (५० टक्के), लातूर (३३ टक्के), भंडारा (३३ टक्के), छत्रपती संभाजीनगर ग्रामीण (२९ टक्के) आणि अमरावती (२५ टक्के) यांचा उल्लेखनीय सहभाग आहे. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मुंबईत सर्वाधिक १,८७८ अपघात घडले, तर नाशिक ग्रामीण जिल्हा मृत्यूच्या दृष्टीने आघाडीवर आहे, जिथे ६५६ अपघातात अनेक मृत्यू नोंदवले गेले.

# पालकांना सावध करणारी बातमी!

## तिसरीतील विद्यार्थ्यांकडून घृणास्पद प्रकार, अश्लील व्हिडिओ पाहून मित्रालाच...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

लातूर जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. टिव्ही, स्मार्टफोन यांचा वाढता वापर यामुळं शाळकरी मुलांचे वर्तन बिघडत चालले आहे. मुलं चुकीच्या मार्गाला लागले आहेत. लातूरमध्ये समस्त पालकांना हादरवणारी एक घटना घडली आहे. दोन शाळकरी मुलांच्या वर्तनामुळं एकच खळबळ उडाली आहे.

लहान मुलंही मोबाईलच्या आहारी गेले आहेत. आता अत्यावश्यक गरजांमध्ये मोबाईलचा समावेश आहे. मात्र मोबाईलमध्ये मुलं काय बघतात? त्यांचे काय सुरू आहे? यावर पालकांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. लातूरमध्ये जी घटना घडली आहे, ती पालकांची चिंता वाढवणारी आहे. इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या दोन विद्यार्थांनी केलेला घृणास्पद प्रकारामुळं एकच गोंधळ उडाला आहे.




तिसरीच्या वर्गात शिकणारा विद्यार्थी त्याचे वयच साधारण ८-९ वर्षे असेल. या वयात अभ्यास, खेळणे आणि दंगा करण्याचे सोडून या विद्यार्थ्यांनी वर्गमित्रावरच अश्लील व्हिडिओ पाहून अनैसर्गिक अत्याचार केल्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेने पालकही भेदरले असून शाळा प्रशासनातही खळबळ उडाली आहे. गुरुवारी ही घटना उघडकीस आली आहे.

लातूर शहराजवळ असलेल्या एका सरकारी शाळेतच ही घटना घडली आहे. तिसरीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्यानें सोशल मीडियावर एक अश्लील व्हिडीओ बघितला. शाळेतील वर्गात तो होता. अश्लील व्हिडिओ पाहून त्याने वर्गमित्रावरच अनैसर्गिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. ही घटना जेव्हा शिक्षकांना कळली, तेव्हा तेही हादरून गेले. विद्यार्थ्याची विचारपूस केल्यानंतर त्याने सोशल मीडियावर व्हिडीओ बघितल्याचे आणि ते बघून असे करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. या घटनेने शाळेत खळबळ उडाली. शिक्षक आणि पालकांनीही धक्का बसला आहे.

### बारा वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकास मरेपर्यंत जन्मठेप

सोलापुरात बारा वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकास मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली असून दोन वर्षांनी निकाल लागला आहे. सोलापूर जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी एन सुरवसे यांनी शिक्षकाला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. धनाजी सोपान इंगळे असं मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा झालेल्या शिक्षकाचे नाव असून शाळेत गेलेल्या पीडीतेवर १४ एप्रिल २०२३ रोजी शिक्षक आरोपी इंगळे याने अत्याचार केला होता. सदर प्रकरणात चार ते पाच पीडित विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याची तक्रार समोर आली होती.

# देशात ६ कोटी मृतांचे आधार कार्ड सक्रिय... 'यूआयडीएआय' सुरू करणार सर्वेक्षण

**■मुंबई। प्रतिनिधी,**

देशातील प्रत्येक नागरिकाला आधार क्रमांक देऊन १५ वर्षे झाली आहेत. या काळात १.४२ कोटींहून अधिक आधार कार्ड जारी करण्यात आले होते. परंतु याकाळात ८ कोटींहून अधिक आधार कार्डधारकांचा मृत्यू होऊनही, केवळ १.८३ कोटी कार्ड निष्क्रिय करण्यात आले आहेत. सुमारे ६ कोटी मृतांचे आधार क्रमांक अजूनही सक्रिय आहेत. यामुळे बँक फसवणूक, बनावट खाती आणि सरकारी योजनांच्या लाभांचा गैरवापर होण्याचा धोका वाढला आहे. यामुळे 'यूआयडीएआय' याबाबत सर्वेक्षण सुरू करणार आहे. 'युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया'चे (यूआयडीएआय) सीईओ भुवनेश कुमार यांच्या मते, यूआयडीएआयला आतापर्यंत 'रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया'कडून (आरजीआय) १५.५ दशलक्ष मृत व्यक्तींचा डेटा मिळाला आहे. नोव्हेंबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान या यादीत अतिरिक्त ३.८ दशलक्ष व्यक्तींची भर पडली. यापैकी १.१७ कोटी लोकांची ओळख पटली आहे आणि त्यांचे आधार कार्ड निष्क्रिय करण्यात आले आहेत. डिसेंबरपर्यंत २० दशलक्ष कार्ड निष्क्रिय होतील, असा प्राधिकरणाचा अंदाज आहे.



### पश्चिम बंगालमध्ये ३४ लाख आधारकार्डधारक 'मृत'

पश्चिम बंगालमध्ये तब्बल ३४ लाख आधार कार्डधारक 'मृत' असल्याचे 'यूआयडीएआय'ने निवडणूक आयोगाला कळवले आहे. ही माहिती आधार योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंतच्या कालावधीवर आधारित आहे. प्राधिकरण आणि पश्चिम बंगालच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी बुधवारी एकत्रित बैठक घेतली. यावेळी प्राधिकरणाने सांगितले की, सुमारे १३ लाख नागरिक असे होते, ज्यांच्याकडे कधीच आधार कार्ड नव्हते, पण त्यांच्या मृत्यूची नोंद आता झाली आहे. ही बैठक सध्या राज्यात सुरू असलेल्या 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एसआयआर) मोहिमेच्या पार्श्वभूमीवर झाली. या मोहिमेअंतर्गत मतदार याद्यांचे पुनरावलोकन आणि दुरुस्ती केली जात आहे.

# लाडक्या बहिणींची सर्वात मोठी चिंता मिटली, १५०० रुपयांबाबत सरकारचा थेट निर्णय!




### आदिती तटकरे यांनी काय माहिती दिली?

आदिती तटकरे यांनी सध्या सुरू असलेल्या केवायसीच्या प्रक्रियेबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. लाडके बहीण योजनांमध्ये वेबसाईटमध्ये काही बदल होत आहेत, त्यामुळे वेळ लागत आहे. ज्या महिलेला पती आणि वडील नाही त्यांना केवायसी करता येत नाहीये. हीच अडचण लक्षात घेऊन आता संकेतस्थळात महत्त्वाचे बदल केले जात आहे. या बदलांमुळे आता सर्व महिलांना केवायसी करता येईल. त्यासाठीच हे बदल केल जात आहेत, असे तटकरे यांनी सांगिले आहे.

**■ठाणे। प्रतिनिधी,**

राज्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे लाखो महिलांना लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात महिन्याला १५०० रुपयांची मदत पाठवली जाते. याच पैशांचा महिलांना चांगलाच आधार मिळतो. सध्या राज्य सरकारने सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्याचे आवाहन केले आहे.

त्यासाठी संकेतस्थळही देण्यात आले आहे. मात्र ही केवायसी करताना अनेक अडचणी येत आहेत. याच अडचणी दूर करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. असे असतानाच आता महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी सर्वच लाडक्या बहिणींना महत्त्वाची माहिती दिली आहे. या माहितीनुसार आता राज्यभरातील लाभार्थी महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**संकेतस्थळात करण्यात येत आहे बदल**

सध्या केवायसी करताना खूप अडचण येत आहे. या तांत्रिक अडचणीवरही तटकरे यांनी भाष्य केले आहे. महिलांना येत असलेली तांत्रिक अडचण लक्षात घेण्यात आले आहेत. सध्या संकेतस्थळात काही बदल करण्यात येत आहेत. हे बदल झाल्यानंतर कोणतीही अडचण येणार नाही. लगेच केवायसीची प्रक्रिया पूर्ण होईल, असे आदिती तटकरे यांनी सांगितले आहे.

**सरकार केवायसीची मुदत वाढवून देणार का?**

दरम्यान, केवायसी करण्याची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर २०२५ आहे. त्यामुळे लवकरात लवकरच ही केवायसी करण्यासाठी महिला प्रयत्नरत आहेत. सध्ये संकेतस्थळात बदल करण्यात येत आहेत. त्यामुळे भविष्यात केवायसी करण्यासाठीची मुदत वाढवली जावी, अशी मागणी केली जात आहे. ही मागणी राज्य सरकार मान्य करणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# हे प्रश्न अनुत्तरित आहेत




**सगळे नियम धाब्यावर बसवून स्वप्नवत वाटेल असा जमीन व्यवहार घडतो आणि कोणालाच त्याची खबर नसते, असा अविश्वसनीय प्रकार पुणे परिसरात घडला. नेमक्या कुणाच्या राजकीय वरदहस्ताने हा प्रकार घडला आणि नंतर बाहेर आला, हे प्रश्न अनुत्तरित आहेत.**

पुण्याच्या मुंढवा परिसरातील ४० एकर जागेच्या खरेदी-विक्रीचा विषय सर्वसामान्यांच्या तोंडात बोटे जावीत इतका अनाकलनीय आणि चमत्कृतीपूर्ण ठरतो आहे. राज्य शासनाच्या नावावर असलेली शेतजमीन कुलमुखत्यारपत्र (पॉवर ऑफ ॲटर्नी) माझ्याकडे आहे असे म्हणत कोणी एका कंपनीला विक्री करतो आणि सरकारदरबारी त्याची नोंदणी प्रचंड उदार अंतःकरणाने अवघ्या ५०० रुपयांत होते, हा चमत्कारच म्हणायचा. सत्ता असेल तर कसलाही चमत्कार घडेल, असा समज दृढ करणारा हा विषय! हा विषय बाहेरच कसा आला, तो कोणी आणला असेल, ती माहिती कोणी कोणाला दिली असेल, हा राजकारणी मंडळीच्या संधोशनकायार्चा विषय आहे. सामान्यांच्या दृष्टीने एकच बाब महत्त्वाची, ती म्हणजे सत्तेत काहीही घडू शकते. सत्ता एवढे अर्निबंध अधिकार कसे काय देते? सत्ता भ्रष्ट असते आणि अमर्याद सत्ता पूर्णपणे भ्रष्ट करते, अशा आशयाचे विधान एका ब्रिटिश इतिहासकाराने केलेले आहे. सत्ता असेल तर तुम्ही काहीही करू शकता हा समज लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने योग्य की अयोग्य हा मूळ मुद्दा आहे. सत्तेचे चमत्कार एवढे वाढले की तिचा मोहच सुटत नाही. सत्तेसाठी काहीही या उक्तीप्रमाणे निवडणुकीत नाना क्लृप्त्या, प्रचंड उचापती, निवडून आल्यानंतर सत्ताप्राप्तीसाठी वाट्टेल तशा उलाढाली, सत्तेत स्थान मिळताच अधिकारांचा स्वैर वापर हा रिवाज झाल्याने पुढे काही खरे नाही. सत्ताधीश असे वागत आहेत म्हटल्यावर प्रशासन तरी कशाला मागे राहील? सत्ताभिमुख रहा आणि सुखी रहा, हा मंत्र बनला. सत्ताधीशांच्या वळचणीला राहून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर सेवेत असतानाच भाऊ, मुलगा, पत्नी यांना तिकीट कसे मिळेल किंवा आपण निवृत्त झाल्यावर ज्यांच्या पसंतीचे काम केले ते आपल्याला पक्षात घेऊन मानाचे स्थान, जमल्यास विधानसभा, विधान परिषदेची उमेदवारी देतील का, हा विचार नोकरशाहीत रुजू लागला. तोच विचार शासकीय कंत्राटदार, पुरवठादार, नेत्यांना हवी ती सेवा देणारे चेले करू लागले. हे सारे करण्याची उमेद निर्माण करते ती सत्ता. मग सेवेत असताना बड्या नेत्यांच्या किंवा त्यांच्या जवळच्या लोकांना हवी तशी सेवा देणे म्हणजे आपले वर्तमान आणि भविष्य दोन्ही सुरक्षित राहील, असा आशाळभूतपणा वाढू लागला. पुणे शहर व परिसरातील मालमत्ता व जमिनींना आलेल्या प्रचंड दराची ज्यांना कल्पना असेल ते या भागातील खरेदी-विक्री, बांधकामे, पाणी-पुरवठा याचे महत्त्व जाणून असतील. अशा शहरात महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती ही काही लॉटरी काढून केली जात नाही. फार पारखून माणसे महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांवर नियुक्त केली जातात. ज्यांना मध्येच बदलले जाते ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन लढण्याची तयारी ठेवतात, हे उगाच घडत नाही. पुणे शहराचे तहसीलदार व उपनिबंधक शासनाच्या ४० एकर जमिनीचा परस्पर व्यवहार करण्याइतके स्वतंत्र आहेत? यावर बालवाडीतल्या मुलाचा फारतर विश्वास बसेल. ज्या शहरात एकेक इंच जमिनीकडे सर्वांचे लक्ष आहे, जिथे अनेक जबाबदार अधिकारी, त्यात भारतीय प्रशासन सेवेतील (आयएएस) अधिकाऱ्यांची संख्या डझनाच्या वर आहे, तिथे असा व्यवहार होतो? त्या जमिनीची किंमत आजच्या बाजारभावाने २७०० ते ३००० कोटी आहे, १८०० कोटी नाही, अशी चर्चा आहे. हा व्यवहार झाला कसा, याचा जाब तहसीलदार व उपनिबंधक हे दोघेच देऊ शकतील, असे ज्यांना वाटते त्यांच्याबाबत सहानुभूती व्यक्त करणेच आपल्या हातात आहे. एकतर जमीन राज्य शासनाच्या नावाची. पण तिथे २७२ लोक कुळ लावून आहेत आणि त्यांचे कुलमुखत्यारपत्र एका व्यक्तीच्या नावाने आहे हे गृहित धरायचे. शेतजमीन असताना व त्यावर सध्या केंद्र सरकारच्या एका उपक्रमाचा ताबा असताना जिल्हा उद्योग केंद्राने मात्र सॉफ्टवेअर टेक्नॉलाजी पार्क उभारायचे म्हणून खरेदी करणाऱ्या कंपनीला उद्देशपत्र (एलओआय) द्यायचे, ते नोंदणी करणाराने मुद्रांकशुल्क सवलतीसाठी योग्य म्हणून गृहित धरायचे व ५०० रुपयांत मामला उरकायचा, हा केवळ आणि केवळ चमत्कार आहे. केवळ उद्देशपत्रावर मुद्रांकशुल्कात सवलत मिळत नाही, त्यासाठी राज्य शासनाची मंजुरी लागते हे माहिती असूनही हा प्रकार झाला. एखाद्या सामान्य माणसाने अशा खटाटोपी करण्याचा प्रयत्न जरी केला असता तर त्याला येरवड्यात वेड्याच्या इस्पितळात तपासणीसाठी पाठवले असते किंवा तिथल्याच तुरुंगात टाकले असते. पण इथे येते सत्ता. ती शासन-प्रशासन दोघेही मनमानीपणे वापरतात. हे नाट्य लोकांसमोर आल्यावर राज्याचे महसूलमंत्री, जे नोंदणी विभाग व तहसीलदार या दोघांचे सर्वोच्च विभागप्रमुख आहेत, ते म्हणतात की, माझ्याकडे तक्रारच आली नाही. आली की चौकशी करू. दोन दिवस ते अशी विधाने करत असताना इकडे त्यांच्याच विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची चौकशी समितीही नियुक्त होते. ज्यांचे चिरंजीव खरेदी करणाऱ्या कंपनीचे मुखिया आहेत, त्यांचे पिताश्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार पहिल्या दिवशी म्हणतात, मुले सज्ञान झाल्यावर स्वतंत्र व्यवसाय करतात. मी तीन-चार महिन्यांपूर्वीच म्हणालो होतो की चुकीचे व्यवहार मला मान्य नाहीत, मी नियमाने चालणारा आहे, वगैरे वगैरे. दुसऱ्या दिवशी व्यवहार रद्द झाल्याची घोषणा ते स्वतःच करून टाकतात. राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या माहितीकडे कानाडोळा करता येत नाही. या प्रकरणाची फाईल आपल्याकडे आली होती, पण ती आपण नाकारली असे ते म्हणतात. थोरात यांची महसूलमंत्रीपदाची अलीकडची कारकीर्द जून २०२२ मध्ये संपली. आपल्याकडे या प्रकरणाची फाईल तीन वेळा आली होती. पण ती आपण नाकारल्याचे व उच्च न्यायालयानेही हा विषय नाकारल्याचे ते सांगतात. आपल्यानंतर ज्या महसूलमंत्र्यांकडे (म्हणजे राधाकृष्ण विखे-पाटील) ही फाईल गेली ती त्यांनी कोणत्याही निर्णयाशिवाय तशीच ठेवली, असेही ते म्हणतात. थोरात आणि विखे हे दोघेही राजकारणाचा, मंत्रीपदांचा प्रचंड अनुभव असलेले नेते आहेत. त्यांनी या विषयाला हात लावण्याचे धारिष्ट्य केले नसेल तर ते आता कसे झाले? हा विषय कोणी, कशाच्या भरवशावर जिवंत ठेवला? याच काळात ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील एक विषय बोलून गेले आहेत. पुण्यातील जमीन व्यवहारांची २२ प्रकरणे तपासायला घेतली आहेत, असे विधान त्यांनी सांगली येथे केले. भाजपाचे ज्येष्ठ नेते असलेले आणि पाच वर्षे महसूल मंत्री राहिलेले पाटील बेजबाबदार विधान करणार नाहीत, हे उघड आहे. त्यांच्या विधानाचा दुसरा अर्थ असा होतो की पुण्यात जमीन घोटाळ्यांशिवाय काही घडतच नाही. पुणे इतके अपवित्र कसे झाले, कोणी ते होऊ दिले, यावर जबाबदार लोकांनी बोलले पाहिजे. पूर्वेचे ऑक्सफर्ड म्हणवले गेलेले साहित्य-संस्कृती, विचार, संशोधनकार्य याची राजधानी असलेले पुणे आज गुंठासम्राट, पाणीसम्राट, नियम धाब्यावर बसवणारे बांधकामसम्राट याचे आगर बनले आहे. या शहरात नियोजन नावाचा काही प्रकार आहे का, हे येथील वाहतुकीचा बोजवारा पाहिल्यानंतर लक्षात येते. ज्या शहरातील लोकांनी विविध विषयांच्या धोरणआखणीत योगदान दिले ते शहर कुठे आहे याचा विचारसुद्धा संपलेला आहे. धन्य आहे ती सत्ता आणि तिचे असे बीभत्स स्वरूप!

# भाजप कुबड्यामुक्तीच्या दिशेने



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे ४ नोव्हेंबर रोजी बिगुल वाजले. खरेतर निवडणुकांची घोषणा हे केवळ औचित्य होते. दिवाळीनंतर केव्हाही निवडणुका जाहीर होतील याची सर्वांना कल्पना होती. तसेच 31 जानेवारी 2026 पूर्वी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. त्यामुळे ठरल्याप्रमाणे निवडणुका जाहीर झाल्या, असे म्हणायला हरकत नाही. आता निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात २४६ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी अर्ज स्वीकृतीला सुरुवात झाली आहे. तत्पूर्वी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यामध्ये अजूनही एकत्रपणे की स्वतंत्रपणे निवडणूक लढवावी, याबाबत एकमत झालेले नाही. असे असले तरी आतून सर्वांना स्वबळावर निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. कारण या निमित्ताने पक्षाची ताकद आजमावता येते. जी महायुती आधीपासून आम्ही एकत्र लढणार असा दावा करत होती त्यांच्यात जमेल तिथे एकत्र नाहीतर स्वबळावर, अशी भाषा मधल्या काळात सुरू झाली होती. मात्र, अमित शहांनी मुंबई दौऱ्यात भाजप कुबड्यावर उभा राहणारा पक्ष नाही, असे म्हणत भाजप नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या हृदयात आणि मनगटात स्वबळाचे प्राण ओतल्यावर भाजप सर्वत्र स्वबळाची तयारी करत आहे. मात्र, मुंबईतील समीकरणे वेगळी आहेत.

ठाकरे बंधू एकत्र आल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसे यांच्या युतीचे पूर्ण संकेत आहेत. अशावेळी मुंबईत महायुतीने लढण्याचा निर्णय होत आहे. मुंबईत ठाकरे सेनेच्या अनेक माजी नगरसेवकांनी शिंदे सेनेत प्रवेश केला आहे. भाजपचीही ताकद वाढली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीची ताकद त्यांना आणि त्यांच्या सहकारी पक्षांना ठाऊक आहे. त्यामुळे मुंबईतील जागावाटप महायुतीसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. शिंदेसेनेत माजी नगरसेवकांची गर्दी आणि भाजपकडे प्रभाग गेल्यास जागावाटपाचे कसे होणार, हा प्रश्न शिंदे सेनेला सतावत आहेच. अशावेळी कुबड्यामुक्त भाजपची चर्चा सुरू झाली आहे. त्याचाच पहिला ॲक्शन प्लान भाजपच्या जिल्हा प्रभारींच्या बैठकीत दिसून आला. भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे राज्यातील निवडणुकांची जबाबदारी असायला हवी होती. मात्र, त्यांनी ठाणे महापालिका आणि कल्याण-डोंबिवली महापालिका स्वबळावर जिंकण्याचा विडा उचलल्यामुळे राज्यातील निवडणुकांची जबाबदारी चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. भाजपने एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना जवळ घेतले ते काही त्यांना मोठे करण्यासाठी नाही. शिंदेंना जवळ घेऊन त्यांनी त्यांचाच एकेकाळी मित्र असलेल्या शिवसेनेला कमजोर करून सत्ता मिळवली. सत्तेसाठी अजित पवार यांना जवळ करण्याची त्यांना गरज नव्हती. पण राष्ट्रवादी कॉँग्रेस फोडून शरद पवारांची ताकद कमी करण्याचा त्यांचा हेतू होता, तो त्यांनी साध्य केला. आता या दोघांची गरज कमी करण्यासाठी भाजपची धडपड चाललेली आहे.

ठाणे महापालिका आणि कल्याण-डोंबिवली महापालिकांवर भाजपला संपूर्ण सत्ता हवी आहे. शिवसेनेचे प्रमुख आणि महायुतीतील भिडू एकनाथ शिंदे आणि त्यांचे पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांचे दोन्ही महापालिकांवरील वर्चस्व कमी करण्याचे प्रयत्न भाजपकडून अगदी शिस्तबद्ध पद्धतीने सुरू आहेत. त्यामुळे काही दिवसांपासून भाजपमध्ये शिवसेनेच्या अनेक माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांची मेगाभरती सुरू आहे. हे सर्व प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत होत आहे. त्याला शिवसेनेकडूनही तेवढ्याच ताकदीने उत्तर देण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे समोरासमोर हसत असले तरी दोन्हीकडून एकमेकांचे पंख छाटण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यातच ठाणे जिल्ह्यात भाजपचे नेते आणि वनमंत्री वारंवार एकनाथ शिंदे यांना आव्हान देत आहेत. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात भाजपने एकनाथ शिंदे यांची कोंडी करण्यासाठी चांगलाच चक्रव्यूह रचला आहे. तत्पूर्वी एकनाथ शिंदे यांच्या काही निर्णयांना स्थगिती किंवा बदलण्यात आल्यानेही शिंदे नाराज झाले होते. वरवर महायुतीतील तिन्ही भिडू आम्ही एक आहोत, आमचे चांगले चालले आहे, उगाच भांडणे लावू नका, असे म्हणत असले तरी भाजप किंवा शिवसेना नेत्यांची एकमेकांविरोधात होणारी वक्तव्ये लपून राहिलेली नाहीत.

इकडे पार्थ पवारांच्या जमीन प्रकरणातून वेगळाच डाव टाकल्याची चर्चा आहे. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी पार्थ पवार यांच्या जमिनीचे प्रकरण बाहेर काढून अजित पवारांना खिंडीत गाठण्याचा हा प्रयत्न असल्याचे बोलले जाते. आता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे आणि महिनाभरात अहवाल येईल. त्यामुळे निवडणूक प्रचारात अजित पवार काहीसे बॅकफूट जातील, अशीही शक्यता आहे. आता महायुतीने एकमेकांविरोधात निवडणूक लढवली तर एकमेकांविरोधात कडवट टीका टाळावी, मैत्रीपूर्ण लढत व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मुळातच निवडणुकीत विजय आणि पराजय हेच अंतिम सत्य असल्यामुळे मैत्रीपूर्ण लढत ही केवळ कवी कल्पना म्हटले तरी चालेल. नगरपंचायती आणि नगर परिषदांच्या निवडणुकांनंतर ३२ जिल्हा परिषदा आणि २९ महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात स्वबळावर बाजी मारली तर भाजपचा आत्मविश्वास वाढेल आणि पुढच्या निवडणुकांमध्ये स्वबळाचा नारा देता येईल, अशी रणनीती असावी. मात्र, काहीही झाले तरी आता दोन्ही कुबड्या नकोत, या दिशेने भाजपने प्रवास सुरू केला आहे, एवढे नक्की!

# नियोजनबद्ध आत्मघाती हल्ला

यंदा २२ एप्रिलला पाकिस्तानी दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पुलवामा येथे केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला. भारताने ६ मेच्या रात्रीपासून ४ दिवस पाकिस्तानमध्ये घुसून 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबवली. 'जैश-ए-मोहंमद'सह अन्य दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. शंभरहून अधिक दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. त्यातही 'जैश'चा म्होरक्या मसूद अजहरच्या कुटुंबाचा खात्मा करण्यात आला. त्यामुळे चवताळलेली 'जैश' स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये नाक कापल्यानंतर पाकिस्तानमधील दहशतवादी गट काहीतरी करणार हे अपेक्षित होतेच. त्यामुळे तर 'जैश'ने आता महिलांची दहशतवादी ब्रिगेड स्थापन करून भारताविरोधात वापरण्याचे ठरवले होते. अलीकडेच 'जैश'चा म्होरक्या मसूदने भारतात दहशतवादी कारवाया करण्याची धमकी दिली. त्यानंतर भारतातील तपास यंत्रणा सक्रिय झाल्या. जम्मू-काश्मीर, फरिदाबाद, लखनऊ, अहमदाबाद येथून काहीजणांना अटक केली. यातील बहुतेकांचा 'जैश'शी संबंध आहे. भारताचा मानबिंदू असलेल्या लाल किल्ला परिसरातील मेट्रो स्टेशनजवळ अतिशय नियोजनबद्धतेने स्फोट घडवत सामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण करता आली हे महत्त्वाचे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय तपास संस्था, दिल्ली पोलीस, केंद्रीय अन्वेषण विभाग, फॉरेन्सिक यंत्रणा तसेच अन्य घटकांशी चर्चा करून दिल्लीच्या स्फोटाचे मूळ शोधायला सुरुवात केली. फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांनी घटनास्थळावरून पुरावे गोळा केले. दिल्ली पोलीस, 'एनआयए', 'एनएसजी' आणि 'एफएसएल'च्या पथकांनी तपास सुरू केला. घटनास्थळाभोवती असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. कोणत्याही दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली नसली, तरी पूर्वी अटक केलेल्यांच्या तपासातून त्यांचा 'जैश'शी आणि अटक केलेल्यांचा दिल्ली बॉंबस्फोटाशी संबंध जोडला जात आहे. स्फोटानंतर राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील सुरक्षा संस्थांना सतर्क करण्यात आले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) दिल्ली मेट्रो, लाल किल्ला, सरकारी इमारती आणि इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळासह सर्व संवेदनशील ठिकाणी सुरक्षा कडक केली. संवेदनशील प्रतिष्ठानांवर अतिरिक्त दल तैनात करण्यात आले असले, तरी हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. कोणत्याही दहशतवादी घटनेनंतर देशात काही दिवस सतर्कता बाळगली जाते आणि नंतर दुर्लक्ष केले जाते.

दरम्यान, केंद्रीय एजन्सींसह हरियाणा आणि उत्तर प्रदेश पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'अन्सार गजवत-उल-हिंद'शी संबंधित 'एका व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्यूलचा पदार्फाश करण्यात आला. तो काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये पसरला होता. अटक केलेला संशयित दहशतवादी डॉ. मुझमिल अहमद गनी उर्फ मुसैब याच्या तपासातून पोलीस यंत्रणेला मिळालेली माहिती धक्कादायक आहे. त्याच्याशी संबंधित महिला डॉ. शाहीन हिला अलीकडेच लखनऊमध्ये अटक करण्यात आली. तिच्या कारमधून एके-४७ रायफल जप्त करण्यात आली. यापूर्वी, अनंतनाग येथील रहिवासी डॉ. आदिल अहमद याला ७ तारखेला सहारनपूरमध्ये अटक करण्यात आली. तो अनंतनाग येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत होता. आरिफ निसार दार, यासिर-उल-अशरफ आणि मकसूद अहमद दार उर्फ शाहिद हे नौगाम, श्रीनगरचे, मौलवी इरफान अहमद शोपियानचा, जमीर अहमद अहंगर हा गंदरबलचा, डॉ. मुझम्मिल अहमद गनई आणि डॉ. आदिल हे कुलगाममधील नागरिक आहेत. स्फोट झालेल्या कारच्या विक्रीचे टप्पे पाहिल्यास हे कनेक्शन पुलवामापर्यंत पोहोचते. या प्रकरणात डॉ. उमरसह आणखी काहीजणांना अटक होण्याची शक्यता आहे. मुझम्मिल आणि आदिलच्या फोनवर अनेक पाकिस्तानी नंबर सापडले. मुझम्मिल अल फलाह विद्यापीठात डॉक्टर म्हणून काम करत होता. २,९०० किलो स्फोटकांपैकी ३६० किलो स्फोटके आणि काही शस्त्रे तसेच दारूगोळा डॉ. मुझम्मिलच्या फरिदाबादमधील भाड्याच्या घरातून जप्त करण्यात आला. फतेहपूर तागा गावातील एका खोलीतून २,५५० किलो अमोनियम नायट्रेट जप्त करण्यात आले. मुज्झमिलने श्रीनगरमध्ये 'जैश-ए-मोहम्मद'च्या समर्थनार्थ पोस्टर्स लावली होती. दहशतवादी मॉड्यूलचा पदार्फाश करून, सुरक्षा यंत्रणांनी 'जैश-ए-मोहम्मद' आणि भारतातील 'इसिस'चा गट 'अन्सार गजवत-उल-हिंद'च्या धोकादायक योजना उधळून लावल्या; परंतु दिल्लीच्या कटाचा सुगावा लागला नाही.

जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचा वापर शेकडो अत्यंत शक्तिशाली आयईडी (इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइसेस) बनवण्यासाठी केला गेला असता. अमोनियम नायट्रेट हे एक पांढरे, पावडरसारखे रसायन आहे. ते फार महाग नसते. त्यात डेटोनेटर, बॅटरी आणि टायमर जोडल्याने एक घातक बॉम्ब तयार होतो. डॉ. मुझम्मिल अहमद गनी उर्फ मुसैब याने चौकशीदरम्यान कबुली दिली. त्याच्या पाकिस्तानी हँडलरने त्याला सांगितलं होतं, की या वेळी स्फोट इतका भयानक असेल, की मृतांची संख्या हजारोंमध्ये जाईल. दहशतवादी संघटनेची ही धोकादायक योजना अमलात आणण्यासाठी २९०० किलो स्फोटके फरिदाबादला पाठवण्यात आली होती. फरिदाबादमधील यात्रेला लक्ष्य करण्याचा दहशतवाद्यांचा कट होता. त्यात डॉ. शाहीन सहभागी होती. या यात्रेला सुमारे ४० हजार लोक उपस्थित होते. यात्रेला लक्ष्य करण्यापूर्वी संशयित दहशतवादी मुसैबला अटक करण्यात आली. त्यामुळे त्याचा कट उधळला. डॉ. उमर त्यांच्या कटात सहभागी होता. त्याचा संबंध दिल्ली बॉम्बस्फोटाशी जोडला जात आहे. तो अजूनही तपास यंत्रणांना सापडलेला नाही.




दिल्लीच्या लाल किल्ल्यानजीक घडवलेला बॉम्बस्फोट आणि त्यात वापरलेली स्फोटके पाहता हे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने घडवलेले दहशतवादी कृत्य मानता येते. 'जैश-ए-मोहम्मद' या अतिरेकी संघटनेशी संबंधित दहशतवाद्यांनी देशाच्या राजधानीमध्ये स्फोट घडवून सुरक्षा यंत्रणांना आव्हान दिले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या सुमारास स्फोट घडवून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे.

२०१९ मध्ये दहशतवाद्यांनी पुलवामा येथे अशाच प्रकारच्या स्फोटकांनी भरलेल्या वाहनाचा स्फोट केला. त्यात ४० सैनिकांचे बलिदान झाले. कारमध्ये झालेल्या स्फोटाच्या कारणाबद्दल अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. या घटना स्थानिक पातळीवर घडल्या होत्या की त्यांचा देशाबाहेर संबंध होता? उमर मोहम्मदच दुर्घटनाग्रस्त आय-२० कार चालवत असल्याचा संशय आहे. पोलीस आता कारच्या ड्रायव्हरच्या सीटवर सापडलेल्या मृतदेहाची डीएनए चाचणी करत आहेत. दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाला सीसीटीव्ही फुटेजमधून अनेक महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. दहशतवादी गटांकडून वापरली जाणारी ही एक प्रसिद्ध कार्यपद्धती आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या फॉरेन्सिक आणि दहशतवादविरोधी पथकांना काही आश्चर्यकारक गोष्टी आढळल्या. अशा बॉम्बस्फोटांनंतर जमिनीवर एक खड्डा तयार होतो आणि शार्पनेल विखुरलेले असते; परंतु येथे असे काहीही आढळले नाही. आरडीएक्स आणि अमोनियम नायट्रेटचे मिश्रण किंवा अत्यंत ज्वलनशील रसायन वापरण्यात आल्यामुळे खड्डा पडला नसावा, असा तज्ज्ञांचा अंदाज होता. हा आत्मघातकी हल्ला होता का याचाही तपास पोलीस करत आहेत. तथापि, या सिद्धांतावर प्रश्न उपस्थित करणारी एक बाब म्हणजे स्फोटाच्या वेळी कारमध्ये तीन लोक होते. सहसा आत्मघातकी हल्ल्यांमध्ये फक्त एक किंवा दोन लोक असतात. लाल किल्ल्याअगोदर ही कार सुन्हेरी मशिदीजवळ गाडी दिसली. ती दोन तास तिथेच राहिली. त्यानंतर ती लाल किल्ल्याकडे नेण्यात आली. बहुतेक लोकांच्या मृतदेहावर शार्पनेलचे कोणतेही चिन्ह नव्हते. एकंदरीत, दिल्लीच्या घटनेमागे मोठे षडयंत्र असून त्यातून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा हेतू होता, हे स्पष्ट दिसते.

# बिहारी वास्तव

बिहारच्या बहुचर्चित विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या (शुक्रवारी) होईल आणि उद्याच निकालही जगजाहीर होतील. नव्या प्रथेनुसार त्यापूर्वी परवाच विविध माध्यम संस्थांनी आपल्या मतदानोत्तर सर्वेक्षणांचे अंदाज जाहीर केले. सर्वच्या सर्व अंदाज राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल, असेच सांगत असून भारतीय जनता पक्ष हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष असेल, असेही भविष्य त्यांनी वर्तवले आहे. मतदानोत्तर सर्वेक्षणातल्या निष्कर्षांना बऱ्याच मर्यादा असतात. अशा सर्वेक्षणांचे निष्कर्ष कधीतरीच बरोबर ठरले आहेत. बहुतांश वेळा ते चुकीचेच ठरतात. अगदी बिहारमधल्या मागच्या दोन निवडणुकांतले अंदाज असेच चुकीचे ठरले होते. अंदाज चुकण्याचं सर्वात मोठं कारण पूर्ण शास्त्रीय प्रक्रियेचा अभाव, 'सुतावरून स्वर्ग' गाठत निष्कर्ष काढण्याची पद्धत. निवडणुकीचं साधारण वारं पाहून नजरअंदाज पद्धतीने भाकितं वर्तवण्याची सवय; पण ते मांडताना छातीठोक आत्मविश्वासाचं प्रदर्शन! भाकीत वर्तवताना आपलंच भाकीत कसं अचूक असेल हे सांगणारे, त्याचं समर्थन; आणि त्यावर कडी म्हणजे तेच सत्य मानून त्याचं विश्लेषणही करणारे प्रत्यक्ष निकाल लागल्यानंतर कुठे दिसत नाहीत. प्रत्यक्ष निकालाच्या जवळपास अंदाज आला, तर त्याची शेखी मिरवायला हे पुढे असतात; पण अंदाज फसला, तर त्याचं कारण काय, हे सांगायला अजून तरी कधीही कोणी टीव्हीच्या पडद्यावर आलेलं दिसलं नाही. बिहारमध्ये मतदारांनी काँग्रेसला खूपच दुबळं केलं आहे. महायुतीतल्या सगळ्या पक्षांना हे माहीत असूनही मोठ्या घरचं दुखणं असल्याने कोणी बोलू शकत नाही. गेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या वाईट कामगिरीने विरोधी आघाडीचा घात केला होता. यावेळीही 'महागठबंधन' म्हणून मैदानात उतरलेल्या महाआघाडीला तीच भीती आहे. बिहारचं राजकारण हे करिश्म्यावर चालणारं राजकारण नाही. जात हाच तिथल्या राजकारणाचा पाया आहे. जातीआधारित मतगठ्ठा तयार करणं आणि त्यांचा जास्तीत जास्त विश्वास संपादन करत मतपेटीपर्यंत पोहोचणं हेच बिहारच्या राजकारणाचं इंगित आहे. काँग्रेसला ते माहीत असायलाच हवं. बिहारचं हे घट्ट जातवास्तव नवी पिढी बदलेल, असं दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत म्हटलं जातं. पण, दर निकालानंतर नव्या मतदारांनीही आपल्या राज्याचा जुनाच ट्रेंड कायम ठेवल्याचं दिसतं तेव्हां विश्लेषणाची दिशा बदलते. भारतीय जनता पक्षाने हे पूर्वीच ओळखलं आणि आपली प्रतिमा पूर्णपणे बदलली. दिवंगत कर्पुरी ठाकूर यांच्या दोन शिष्यांपैकी नितीशकुमार यांना लालूप्रसाद यांच्यापासून बाजूला करून त्यांनी त्याची सुरुवात केली. दिवंगत ठाकूर यांनी इतर मागासवर्गीय आणि मागास जातींची बसवलेली भक्कम घडी लक्षात घेऊन त्यांनी ठाकूर यांना मरणोत्तर 'भारतरत्न'ने गौरवलंच; शिवाय त्यांना 'जननायक' ही उपाधीही बहाल केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भाषणांतूनही कपुर्री ठाकूर यांचं सन्मानपूर्वक स्मरण केलं. बिहारमध्ये गेल्यानंतर तर ते ठाकूर यांच्या पुतळ्याला वंदन केल्याशिवाय राहत नाहीत. त्यांचे प्रयत्न प्रामाणिक आहेत, पक्षाला व्यापक जनाधार मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पक्षाचा मतदार तयार करण्याचा, पक्षाला सामाजिक आधार मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पक्षाची व्यूहरचना ठरवणाऱ्यांची दिशाही बरोबर आहे; पण तरीही त्यांना अजून 'स्वतःचा चेहरा' मिळेना ही वस्तुस्थिती आहे. अंशतः स्मृतीभ्रंश झालेल्या नितीशकुमार यांचा चेहराच त्यांना आजही पुढे करावा लागतो आहे. भाजप यावेळी तरी आपला चेहरा घेऊन निवडणुकीत उतरेल, असं वाटत होतं. पण तेवढा भरवसा ठेवावा, अशा चेहऱ्याच्या शोधात पक्ष अजूनही आहे, असंच दिसतं.

# डेली डाएटमधून इतक्या कॅलरी करा कमी...



जर तुम्ही हेल्दी असाल आणि तरी सुद्धा तुम्हाला वजन कमी करायचं असेल किंवा फिट रहायचं असेल तर डेली डाएटमधून दररोज काही कॅलरी कमी करून तुम्ही वजन कमी करू शकता. तसेच कॅलरी कमी केल्याने तुमचं आरोग्यही चांगलं राहील. याआधी झालेल्या अनेक रिसर्चमधून ही बाब समोर आली आहे की, लो-कॅलरी डाएटचं सेवन करून आरोग्याशी संबंधित अनेकप्रकारच्या समस्या दूर होतात. अशात तुमचं वय वाढलं तरी तुम्ही तरूण दिसाल.

**डाएटमधून किती कॅलरी कमी कराव्या :** नुकत्याच झालेल्या एका नव्या रिसर्चमधून समोर आले आहे की, डेली डाएटमध्ये दररोज केवळ ३०० कॅलरी कमी करून शरीरात कलेस्ट्रॉलचं प्रमाण, ब्लड प्रेशरचं प्रमाण आणि ब्लड शुगरचं प्रमाण चांगलं होतं. सोबतच अनेकप्रकारच्या मेटाबॉलिज्मशी संबंधित आजार तुमच्या जवळही भटकणार नाहीत. केवळ वेट लॉस नाही तर आरोग्यही चांगलं राहतं द लँसेट डायबिटीस ॲन्ड इंडोक्रिनोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित या रिसर्चमध्ये या गोष्टीचं समर्थन करण्यात आले आहे की, कमी कॅलरीचं सेवन केल्याने केवळ वजन कमी होतं असं नाही तर तुमचं आरोग्यही चांगलं राहतं आणि शरीरात कॉम्प्लेक्स मेटाबॉलिक बदलही होत नाहीत. रिसर्चमध्ये ही गोष्ट सिद्ध करण्यात आली आहे की, जर तुम्ही तुमच्या दररोजच्या कॅलरी इनटेकमध्ये कमतरता आणाल तर याने ना केवळ वजनच कमी होईल तर डायबिटीस आणि ह्रदयाशी संबंधित धोकाही कमी होतो.

**२ वर्ष कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट :** या रिसर्चमध्ये अभ्यासकांनी २१ ते ५० वयोगटातील २०० महिला आणि पुरूषांची निवड केली आणि त्यांना दोन वेगवेगळ्या ग्रुपमध्ये विभागण्यात आले. एका ग्रुपला सांगण्यात आलं की, त्यांना २ वर्षांपर्यंत कॅलरी रिस्ट्रिक्शनची प्रॅक्टिस करायची आहे. या लोकांना सांगण्यात आले की, ते त्यांना हवं ते खाऊ शकतात. पण एक अट आहे. ती म्हणजे त्यांना त्यांच्या रोजच्या कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट करायची होती. तेच दुसऱ्या ग्रुपला सामान्य रूपाने खाणं-पिणं करण्यास सांगण्यात आलं.

**७१ टक्के लोकांचं वजन १० टक्के घटलं :** ज्या ग्रुपमधील लोकांना कॅलरी कमी करण्यास सांगण्यात आले होते, त्यांच्यातील जास्तीत जास्त लोक २५ टक्के कॅलरी करण्याचं टार्गेट पूर्ण करू शकले नाहीत आणि २ वर्षात त्यांनी सरासरी कॅलरीमध्ये ११.९ टक्के घट केली होती. जी दररोजच्या ३०० कॅलरीच्या बरोबरीत आहे. अभ्यासकांना आढळलं की, केवळ १ वर्षातच या ग्रुपमधील लोकांच्या कोलेस्ट्रॉल आणि ब्लड प्रेशरमध्ये कमतरता आढळली. सोबतच साधारण ७१ टक्के लोक त्यांचं वजन १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यशस्वी ठरले.

**प्रोसेस्ड फूड करा अव्हॉइड :** डाएटमध्ये हेल्दी करणे जसे की, फळ आणि भाज्यांचं जास्त सेवन करावं आणि प्रोसेस्ड फूड खाणं कमी करावं. हे दोन्ही प्रभावी उपाय आहेत. या माध्यमातून तुम्ही कॅलरी कमी करू शकता आणि हेल्दी राहू शकता.

# मंत्रांमध्ये असणारी शक्ती



परिवार रक्षामंत्र

**अरिहे सर्व रक्ष हँ फट् स्वाहा।**

हा कुटुंबाचे संरक्षण करणारा मंत्र रोज सकाळी आणि सायंकाळी १ माळ जपून म्हटल्याने आलेले संकट दूर होते.

रोगनिवारक मंत्र

**नमो विप्पोसही पत्ताणं नमो खेलो सहि पत्ताणं**
**नमो जल्लो सहि पत्ताणं नमो सव्वो सहि पत्ताणं स्वाहा।**

हा मंत्र म्हणत दररोज एक माळ जपल्याने सगळ्या प्रकारच्या रोगांपासून मुक्ती मिळते. आपले कष्ट कमी होतात.

द्रव्यप्राप्ती मंत्र

**ह्यी नमो अरिहंताणं सिद्धाणं आयरियाणं**
**उवज्झायाणं साहूणं मम ऋद्धि-वृद्धी-समीहितं कुरू कुरू स्वाहा।**

या मंत्राचे दररोज सकाळ, दुपार, सायंकाळी प्रत्येक वेळी ३२ वेळा मनातल्या मनात जप केल्याने सुख-समृद्धी, धनलाभ आणि कल्याण होते.

**ह्यी श्री कलिकुंड स्वामिने नमः।**

या मंत्राचा सव्वा लाख जप केल्याने कठिणातील कठीण काम सिद्धीस जाते. गरिबी दूर होऊन लक्ष्मी प्राप्ती होते.

**नमो भगवते श्री पार्श्वनाथाय क्षेमं कराय ह्यी नमः।**

या मंत्राचा जप केल्याने अचानक येणारे संकट आणि भीती दूर होते.

**ह्यी श्री हर-हर स्वाहा।**

हा मंत्र दररोज १०८ वेळा जप केल्याने रोग, संकट आणि कोणत्याही प्रकारची चिंता दूर होते.

# सिगरेट न पिणाऱ्यांना फुफुसांचा कॅन्सर होण्याचं प्रमाण वाढत चाललंय

खरे पाहता फुफुसाचा कँसर हा शब्द ऐकल्यावर आपल्यासमोर प्रतिमा उभी राहते ती एका मागोमाग एक असा सिगारेट ओढण्याचा सपाटा लावणाऱ्या चेन स्मोकर्सची. फुफुसाचा कँसर हा सिगारेटच्या, तंबाखूच्या व्यसनामुळे होतो हे आज अगदी सर्वमान्य, जगन्मान्य तत्व आहे. आत्तापर्यंत डॉक्टर तरी हेच समजत होते परंतु नव्या आलेल्या काही धक्कादायक संशोधांचे निष्कर्ष असे सांगतात की ज्या व्यक्तीने कधी तंबाखू खाल्ली नाही किंवा सिगारेट ओढलेली नाही अशा व्यक्ती सुद्धा फुफुसाच्या कँसरला बळी पडू शकतात. खरे पाहता कँसरचं प्राथमिक तत्व हेच आहे की शरीरातील पेशींमध्ये अचानक आणि असामान्य अशी होणारी वाढ. ही वाढ लगेच होत नाही. शरीरात अनेक वर्षे साठून अचानकपणे अशा वाढीचा उद्भव होवू शकतो. त्यामुळे फुफुसाच्या कँसर ला जबाबदार असणारा धूर हा महत्वाचा घटक सिगारेट पिणाऱ्या किंवा न पिणाऱ्या अशा दोन्ही व्यक्तींच्या आयुष्यावर परीणाम करू शकतो. आपण समजून घेऊया की कुठल्या पद्धतीने आणि कुठल्या कारणासाठी सर्वसामान्य सिगारेट न पिणाऱ्या व्यक्ती अशा महाभयानक रोगाच्या विळख्यात सापडतात.

१. **सिगरेटचा धूर पसरलेल्या वातावरणात राहिल्यामुळे :** खरे पाहता जी व्यक्ती सिगारेट पिते तिच्या फुफुसामध्ये निकोटीन साठून राहिलेले असते. मात्र ज्या ठिकाणी बराच काळ व्यक्ती सिगारेट ओढत राहतात अशा वातावरणात देखील ज्या सिगरेट न ओढणाऱ्या व्यक्तींना काम करण्याची वेळ येते तेव्हा त्यांच्याही फुफुसामध्ये वातावरणामध्ये पसरून राहिलेला निकोटीन आणि टार जातो. अनेकदा सिगारेट ओढून झाल्यावर राहिलेले थोटूक न विझवता तसेच सोडले जाते. या थोटकांमधून निघणारा धूर वातावरण प्रदूषित करत राहतो आणि याच वातावरणात जिथे काम करत राहावे लागते अशा व्यक्तीना याचा धोका संभवतो. या क्रियेला सेकंड-हँड स्मोकिंग म्हणतात. म्हणजे सिगारेट ओढली तर नाही पण सिगारेट च्या धुरात खूप वेळा काम करण्याची किंवा रहाण्याची वेळ तर येते अशा वेळी त्या ही व्यक्तीला फुफुसे दुषित होण्याचा धोका सतावतो.

२. कँसरला कारणीभूत ठरणाऱ्या कार्सिनोजेनिक घटकांच्या सानिध्यात केले जाणारे काम काही काही व्यक्तींचे व्यवसाय अत्यंत दुर्दैवी असतात. खाण कामगार, कोळशाच्या खाणीत, वाळूच्या खाणीत काम करणारे लोक कामाच्या ठिकाणी होणाऱ्या प्रदूषणाचे शिकार बनत राहतात. अभ्रकाच्या खाणी तसेच डीझेल चे जे साठे असतात त्या ठिकाणी कँसर ला कारणीभूत ठरणारी कार्सिनोजेनिक घटक प्रचंड प्रमाणात वातावरणात भरून राहिलेले असतात. डीझेल इंजिन असतात त्यांच्यामधून देखील मोठ्या प्रमाणात कार्सिजेन उत्सर्जित होतो. त्यामुळे अशा ठिकाणी काम करणारे लोक भले सिगारेट ओढत नसतील तरीही त्यांच्या बाबतीत कँसर चा धोका जास्त प्रमाणात असतो.

३. **हवा प्रदूषण :** सार्वजनिक वाहतुकीमधून केले जाणारे जे हवेचे प्रदूषण असते त्याच्या धुरात देखील कँसर ला कारणीभूत ठरणारे घटक असतात. अत्यंत दाट लोकवस्तीचे प्रदेश आणि वाहनांची प्रचंड गर्दी असलेल्या ठिकाणी पेट्रोल डीझेल च्या धुरातून होणारा उत्सर्ग कँसर च्या कार्सिजेनिक घटकांचे प्रमाण वाढवतो. २०१० साली डीझेल प्रदूषणाचे जागतिक ओझे या नावाने एक रिपोर्ट प्रसिद्ध करण्यात आला होता त्यात २०१० साली जवळजवळ २,२३,००० मृत्यू हे फुफुसाच्या कँसर चे होते ते ही फक्त डीझेल प्रदुषणाच्या प्रमुख कारणामुळे झालेले असा निष्कर्ष नोंदवण्यात आलेला होता.

४. **रेडीएशन :** किरणोत्सगार्चा संसर्ग किती भयानक असू शकतो हे आपणास हिरोशिमा आणि नागासाकी च्या उदाहरणावरून ठाऊक आहे. खरे पाहता आज असे अनेक उद्योग धंदे आहेत ज्याच्यामधून रेडन नावाचा गॅस बाहेर पडतो. या अप्रत्यक्षपणे वातावरणात पसरणाऱ्या रेडीएशनचा परिणाम म्हणून हवा दुषित होते. अशा वातावरणात राहणाऱ्या आणि काम करणाऱ्या लोकांना फुफुसाचा कँसर होण्याचा धोका सिगारेट ओढणाऱ्या व्यक्तीपेक्षा जवळजवळ ७० पट जास्त संभवतो.

त्यामुळे सिगारेट न पिणाऱ्या व्यक्तींना देखील आपल्या वातावरणाचा अभ्यास करण्याची आणि आपल्या आजूबाजूच्या परिसरात काम करताना काळजी घेण्याची गरज आहे.



# मऊ आणि मुलायम केसांसाठी गुलाबाच्या पाकळ्यांचा असा करा वापर



गुलाबाच्या पाकळ्या, गुलाब पावडर अथवा गुलाबपाण्याचा वापर तुम्ही तुमच्या त्वचेचं सौंदर्य वाढवण्यासाठी अथवा डोळ्यांना थंडावा देण्यासाठी नक्कीच केला असेल. मात्र तुम्हाला गुलाबाच्या पाकळ्या केसांसाठीदेखील तितक्याच उपयुक्त आहे हे माहीत आहे का. केसांमधील कोंडा कमी करण्यासाठी, केस चमकदार आणि मऊ करण्यासाठी, तेलकट केसांचा चिकटपणा कमी करण्यासाठी असं तुम्ही अनेक गोष्टींसाठी गुलाबपाणी, गुलाबाच्या पाकळ्या अथवा गुलाब पावडर वापरू शकता. गुलाबपाण्यामध्ये नैसर्गिक पोषक घटक असतात ज्यामुळे तुमच्या केसांचे सौंदर्य वाढू शकते. गुलाबपाण्यात व्हिटॅमिन ए, बी ३, सी आणि ई मुबलक असते. ज्याचा परिणाम तुमच्या केसांच्या मुळांवर होतो. केसांच्या मुळांचे योग्य पोषण झाल्यामुळे तुमच्या केसांची योग्य वाढ होते. जर तुम्हाला लांबसडक आणि निरोगी केस हवे असतील तर केसांच्या मुळांना तेलासोबत दररोज गुलाबपाणी जरूर लावा. शिवाय सणासुदीला सुंदर केस हवे असतील तर गुलाब पाकळ्यांचा वापर करून असं वाढवा तुमच्या केसांचं सौंदर्य गुलाब पाकळ्यांचा वापर करून तयार करा हेअरमास्क आणि हेअरऑईल

**केसांचा निस्तेजपणा कमी करण्यासाठी**

गुलाब पाकळ्यांमधील पोषक तत्त्व तुमच्या केसांच्या आरोग्यासाठी अतिशय पोषक असतात. ज्यामुळे तुमच्या केसांचा निस्तेजपणा कमी होऊ शकतो.

**कसं तयार कराल हेअर ऑईल**

जोजोबा ऑईलमध्ये गुलाबाच्या पाकळ्या मिसळा. तेल थोडं कोमट करा आणि या तेलाने केसांच्या मुळांना दहा मिनीटं मस्त मसाज करा. वीस मिनीटांनी केस स्वच्छ धुवून टाका. दोन ते तीन दिवसांनी हा मसाज केला तर एका महिन्यात तुमच्या केसांचा निस्तेजपणा कमी होईल.

**केसांमधील कोंडा कमी करण्यासाठी**

हवामानात झालेला बदल अथवा कोरड्या त्वचेमुळे केसांमध्ये कोंडा निर्माण होतो. अशा वेळी सतत ॲंटि डॅन्ड्रफ शॅम्पूचा मारा झाल्यास केसांचे नुकसान होऊ शकते. कोंड्यावर नैसर्गिक उपाय केल्यास नक्कीच चांगला फायदा होऊ शकतो.

**कसा तयार कराल हेअरपॅक**

अर्धा कप मेथीचे दाणे, चार पाच गुलाबाच्या पाकळ्या दोन ते तीन कप गुलाबपाण्यामध्ये चार तास भिजत ठेवा. त्यानंतर त्याची एक जाडसर पेस्ट करून ती केसांना एखाद्या हेअरपॅकप्रमाणे केसांवर लावा. अर्धा तासाने केस स्वच्छ करा. हा उपाय महिन्यातून एकदा केल्यास तुमच्या केसांमधील कोंडा कमी होईल आणि केसांचे आरोग्य वाढेल

**नैसर्गिक ग्लो येण्यासाठी**

तुमचे केस फ्रिझी अथवा कोरडे असतील त्यांना मॅनेज करण्यासाठी तुम्ही गुलाबपाणी वापरू शकता.गुलाबपाण्यामुळे तुमचे केस मऊ आणि मुलायम होतात. शिवाय त्यांच्यावर एक नैसर्गिक चमक दिसू लागते.

**कसा तयार कराल हेअरपॅक**

एका कोरफडीचा गर घ्या त्यामध्ये गुलाबाच्या पाकळ्या अथवा गुलाब पावडर मिसळून एक हेअरपॅक तयार करा. या मिश्रणाची पेस्ट तुम्ही मिक्सरचा वापर करून तयार करू शकता. हा हेअर पॅक केसांना लावून तुम्ही अर्धा तासाने तुमचे केस धुवू शकता. आठवड्यातून एकदा हा उपाय केल्यास तुमचे केस मऊ आणि चमकदार दिसू लागतील.

**केसांचा तेलकटपणा कमी करण्यासाठी**

जर तुमच्या केसांमधील त्वचा तेलकट असेल तर तुमचे केस तेलकट आणि चिकट होतात. अशा केसांवर धुळ आणि माती पटकन चिकटते. ज्यामुळे मग केस लवकर खराब होऊ शकतात. केसांच्या मुळांमधील हे अतिरिक्त तेल कमी करण्यासाठी तुम्ही गुलाबपाण्याने केसांना मसाज करू शकता.

**कसं तयार कराल हेअर ऑईल**

यासाठी गुलाबपाण्यात थोडंसं ऑलिव्ह ऑईल मिसळून त्याने केसांना हळूवार हाताने मसाज करा. नियमित केलेल्या या उपायाने तुमचे केस मऊ आणि मुलायम दिसू लागतील.

# खूप प्रयत्न करूनही येत नाही शांत झोप





व्यायाम करणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशी ठरते. यामुळे आपलं शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी मदत होते. परंतु तुम्हाला माहीत आहे का? व्यायामाचा संबंध फक्त आपल्या शारीरिक आरोग्यावर नाही तर झोपेसोबतही असतो. असं आम्ही सांगत नसून काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या संशोधनातून असं सिद्ध झाले आहे. एका नव्या संशोधनातून असा दाव करण्यात आला आहे की, जे तरूण फिजिकली ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी असतात. ते एक्सरसाइज न करणाऱ्यांच्या तुलनेत जास्त वेळ आणि उत्तम पद्धतीने झोप घेतात.

**एक्सरसाइज केल्याने रात्री १० मिनिटं जास्त झोपतात**

सायन्टिफिक रिपोर्ट्स नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या या संशोधनामध्ये संशोधनकर्त्यांना असं आढळून आलं की, अशा तरूण व्यक्ती ज्या प्रत्येक तासाला काही जास्त परिश्रमाची कामं करतात, ते रात्री १८ मिनिटं लवकर, १० मिनिटं जास्त आणि एक टक्के शांत झोप घेतात. पेन स्टेटच्या डेटा साइंटिस्ट लिंडसे मास्टर म्हणतात की, 'शांत झोप येणं हे तरूणपणी अत्यंत अवघड असतं. कारण या दरम्यान झोप क्लासरूम परफॉर्मन्स, स्ट्रेस आणि इटिंग बिहेवियरमुळे डिस्टर्ब असते. याच गोष्टींवर हा रिसर्च लक्ष केंद्रित करतो. जर तरूण मुलांना प्रत्येक दिवशी जास्त एक्सरसाइज करण्यासाठी प्रोत्साहित केलं गलं तर रात्री त्यांना शांत झोप मिळण्यासाठी मदत होते.



**दिवसभरात आळस केल्याने रात्री झोप येत नाही**

संशोधनातून सिद्ध झालेले सर्व निष्कर्ष दिवसभरात जर तरूण निष्क्रीय राहत असतीस तर रात्री त्यांना शांत झोप लागत नाही. संशोधनमध्ये सहभागी झालेले प्रतिस्पर्धी जेव्ह दिवसभरामध्ये जास्त वेळेसाठी निष्क्रिय असतात. ते रात्रीच्या वेळी लवकर जोपतात आणि सकाळी उशीरा उठतात. पण त्यांची झोप पूर्ण होत नाही. म्हणजेच फिजिकल ॲक्टिव्हीटी आणि झोपेमध्ये संबंध असल्याचे स्पष्ट होते.

**वयाच्या १५ व्या वर्षी ४१७ लोकांना सहभागी करण्यात आलं होतं**

संशोधनासाठी संशोधकांनी ४१७ लोकांना सहभागी केलं होतं. जेव्हा या व्यक्ती १५ वर्षांच्या होत्या, त्यावेळी त्यांना एक्सीलेरोमीटर्स देण्यात आले होते. जे त्यांच्या मनगटावर आणि हिप्सवर बांधण्यात आले होते. जे एक आठवड्यापर्यंत त्यांची फिजिकल ॲक्टिव्हीटी आणि झोप यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम करत होते. या संशोधनाचा उद्देश हाच होता की, सहभागी झालेल्या लोकांकडून त्यांच्या वागणूकीबाबत विचारण्याऐवजी त्यांच्या शारीरिक हालचालिंब आणि झोपेवर लक्ष ठेवणे.

**टिप :** वरील सर्व गोष्टी संशोधनातून सिद्ध झालेल्या असून आम्ही केवळ माहिती म्हणून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत. यातून आम्ही कोणताही दावा करत नाही. त्यामुळे कोणताही उपाय करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घेणे

# नेहमी वाईट नसतं वाढतं वय, असतात काही खास फायदेही !



वाढदिवसाला अनेकजण गमतीने म्हणतात की, आयुष्यातील एक वर्ष कमी झालं. मित्रही गमतीने 'अरे म्हातारा होतोय तू' अशा कमेंट करू लागतात. अनेकांना असा अनुभव आला असेल. सामान्यपणे आपण बघतो की, वाढत्या वयामुळे अनेकजण निराश होऊ लागतात. कारण वाढत्या वयाकडे लोक म्हातारणाशी जोडून बघतात. त्यामुळे कुणी जर वय विचारलं तर अनेकजण वय लपवण्याचा प्रयत्न करतात. पण मुळात वय वाढणं तुमच्या आरोग्यासाठीच नाही तर सौंदयार्साठीही फार फायदेशीर असतं. तज्ज्ञांनुसार तर याचा संबंध मेंदूच्या क्षमतेशी सुद्धा असतो.

**आत्मविश्वास वाढतो :** वाढत्या वयासोबतच अनेक गोष्टी इम्प्रूव्ह होतात. त्यातील एक मुख्य गोष्ट म्हणजे आत्मविश्वास वाढणे. अनेकांना कमी वयात वेगवेगळ्या गोष्टी करण्यात अडचणी, भीती वाटत असते, अनेकांना स्टेजवर जाण्याची भीती वाटत होती, तर कुणाला इंटरव्ह्यूचं टेन्शन आलं असेल. पण जसजसं वय वाढत जातं, तुमचा आत्मविश्वास वाढत जातो.

**सौंदर्य सुद्धा खुलतं :** जसजसं वय वाढत जातं त्याचा सर्वात जास्त प्रभाव त्वचेवर पडतो. वय वाढत असताना त्वचेवरील ऑईल दूर होत जासं आणि त्वचा ड्राय व चांगली होऊ लागते. वयानुसार, सेबेससियस ग्लॅंडमधून ऑइलचा स्त्राव कमी होतो. ज्यामुळे वाढत्या वयासोबत ऑइली त्वचेची समस्याही दूर होते.

**स्मरणशक्ती :** जास्तीत जास्त लोकांची अशी धारणा असते की, वयानुसार मेंदूची क्षमता कमी होऊ लागते. पण इश्यू ऑफ सायकॉलॉजिकल सायन्सच्या एप्रिल २०१५ च्या रिसर्चनुसार, आपल्या कॉग्नीटिव्ह स्कील, ज्यात नाव, नवीन शब्द, माहिती लक्षात ठेवणे या क्षमता वयानुसार वाढत जाते. अभ्यासकांनुसार, विसरण्याची समस्या साठ वर्षांनंतर सुरू होते. हा रिसर्च ५० हजार लोकांच्या आयक्यू आणि मेमरी टेस्टवर केला होता. ज्यात लहान मुले, तरूण आणि वयोवृद्धांचा समावेश होता.

**मायग्रेन होतो दूर :** वाढत्या वयासोबत मायग्रेनची समस्या ठीक होऊ लागते. यूनायटेड किंगडमच्या मायग्रेन ट्रस्टच्या मायग्रेन रिसर्च चॅरिटीनुसार, सर्वच केसेसमध्ये असं होत नाही, पण ४० टक्के लोकांचं असं मत आहे की, त्यांच्या वाढत्या वयासोबत त्यांची समस्या दूर झाली.

**कमी झोप येणे :** वय वाढण्याचा सर्वात मोठा फायदा हा असतो की, तुमच्याकडे काम करण्यासाठी जास्त वेळ असतो. कारण वय वाढण्यासोबत झोप कमी येते. खासकरून एका वयानंतर

# झोपण्याआधी प्या यूजफूल ड्रिंक... जिम न जाता पोटाची चर्बी होईल कमी



दिवसेंदिवस लठ्ठपणाच्या समस्या वाढतच चालल्या आहे. अनेक उपाय करूनही लोकांच वजन कमी होत नाही. तेव्हा तुम्ही या ड्रिंक ट्राय करायला हरकत नाही. त्याचे चांगेल रिजल्टही तुम्हाला बघायला मिळतील. तुमच्या रात्रीच्या आहारावर तुमचं वजन किती वाढू शकतं हे अवलंबून असतं. तेव्हा रात्री झोपण्यापूर्वी या दोन ड्रिंक ट्राय करण्याचे फायदे जाणून घ्या.

**हळदीचं दूध :** हळदीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे औषधी गुणधर्म आहेत.हळदीमध्ये प्रत्येक प्रकारचे न्यूट्रियंट्स असता. त्यामुळे वजन कमी करण्यास हळदीचं दूध फायदेशीर ठरते. झोपण्यापूर्वी या हळदीचं दूध पिल्यास चांगले रिजल्ट मिळतात.

**मेथीचा चहा :** जर तुम्हाला तुमच्या पोटाची चर्बी कमी करायची असेल तर आजच मेथीचा चहा प्यायला सुरूवात करा. हिवाळ्यात जास्त जेवण जेवल्याने तुमची पचनशक्ती बिघडते. मेथीचा चहा तुमची पचनशक्ती सुधारते. याला बनवण्यासाठी एक ग्लास पाणी घ्या त्यात एक चम्मच मेथी टाका. सकाळच्या वेळी हे पाणी गाळून घ्या आणि रात्री हलक गरम करून प्या. याचे तुम्हाला चांगले रिजल्ट्स मिळतील.

**या कारणाने वाढतं वजन :** रात्री निदान झोपण्याच्या दोन तासाआधी जेवायला हवं. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. जेवन करून लगेच झोपणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. त्यामुळे वजन वाढू नये यासाठी झोपण्याच्या दोन तासापूर्वी जेवण करणे गरजेचे आहे.





# पुण्यात आणखी एक भूखंड घोटाळा समोर

## ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या १५ एकर जमिनीची परस्पर विक्री, सहदुय्यम निबंधक निलंबित

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पुण्याजवळ ताथवडे येथील शासकीय मालकीच्या जमिनीची खरेदी-विक्री करताना नियमांचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी पुणे येथील हवेली सहदुय्यम निबंधक कार्यालयातील प्रभारी सहदुय्यम निबंधक विद्या शंकर बडे (सांगळे) यांना निलंबित करण्यात आले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षकाना याबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले.

पार्थ पवार यांच्या कथित भूखंड घोटाळ्यामुळे राज्यातील राजकारण तापले असताना आता पुण्यात आणखी एक घोटाळा समोर आला आहे. त्यात पिंपरी चिंचवडच्या ताथवडे येथील शासनाच्या तब्बल १५ एकर जमिनीची कोट्यवधी रुपयांना परस्पर विक्री करण्यात आली आहे. याप्रकरणी हवेलीच्या सहाय्यक दुय्यम निबंधकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.




**पशुसंवर्धन विभागाला अंधारात ठेवून विक्री**

पिंपरी चिंचवड शहरातील ताथवडे परिसरात पशुसंवर्धन विभागाची सर्व्हे नंबर २० येथे १५ एकर जागा आहे. या जागेची कोट्यवधी रुपयांत पशुसंवर्धन विभागाला अंधारात ठेवून परस्पर विक्री करण्यात आली. हा व्यवहार हेरंब गुपचुप या व्यक्तीने जानेवारी २०२५ मध्ये केला. मुद्रांक शुल्क विभागाने त्याची माहिती पशुसंवर्धन विभागाला दिली. त्यानंतर पशुसंवर्धन विभागाच्या आयुक्तांनी त्याची तक्रार पुण्याच्या विभागीय आयुक्तांकडे केली. त्यानुसार आता पुण्याचे विभागीय आयुक्त व पशुसंवर्धन विभाग या प्रकरणाचा तपास करत आहेत.

पुण्याजवळील मौजे ताथवडे, ता. मुळशी येथील सर्व्हे क्र. २० मधील एकूण ६ हे ३२ आर जमिनीच्या खरेदीखत दस्त क्र. ६८५/२०२५ च्या नोंदणीत ही अनियमितता आढळली. या जमिनीवर पशुसंवर्धन आयुक्तांचा ताबा असून, शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय खरेदी-विक्रीस बंदी असलेली मालमत्ता आहे. दस्तनोंदणीच्या वेळी, बडे यांनी अद्ययावत किंवा नजिकच्या कालावधीतील सातबारा उतारा जोडण्याची बाब दुर्लक्षित केली. त्यांनी जुना सातबारा स्वीकारला. जर त्यांनी दस्त नोंदणीच्या तारखेस लागू असलेला सातबारा तपासला असता, तर त्यावर 'शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय खरेदी-विक्रीस बंदी' हा प्रतिबंधात्मक शेरा दिसला असता आणि दस्त नोंदणी नाकारता आली असती.

उताऱ्यावरील मालक मयत असताना आणि वारसांची नोंद नसतानाही, तांत्रिक अडचणीचे कारण देत 'स्किप' पर्याय वापरून दस्त नोंदणी पूर्ण करण्यात आली. यासाठी त्यांनी वरिष्ठांची कोणतीही परवानगी घेतली नाही, याशिवाय काही अनियमितता करून व्यवहार करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आल्याचे नोंदणी महानिरीक्षकांनी म्हटले आहे.

### 'केईएम'मधील औषधांचा तुटवडा दूर करणार

# मुंबई पालिका अधिकाऱ्यांची ग्वाही

■मुंबई। प्रतिनिधी,

केईएम रुग्णालयातील औषधांचा दोन वर्षाचा तुटवडा दूर केला जाईल, तीन एलिव्हेटर चालू करण्यात येतील, रजिस्ट्रेशनसाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी नवीन दहा रजिस्टर केंद्र आणि डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला जाईल, १२५ स्पेशल रक्त चाचण्या येथेच करून घेतल्या जातील, तसेच एमआरआय चाचणीचा दर हा बाहेर पाठवल्यास पालिका दरानेच करून घेतला जाईल. कूपर रुग्णालयात पुढील आठवड्याभरात पूर्णवेळ वैद्यकीय अधिष्ठाता दिला जाईल, अशी ग्वाही पालिका अधिकाऱ्यांनी दिली असल्याची माहिती भाजप आमदार अमित साटम यांनी दिली.

केईएम रुग्णालयात होत असलेली नागरिकांची गैरसोय आणि खासगी सेंटरमध्ये चाचण्यांमुळे रुग्णांची होणारी लूट पाहून मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी तीव्र संताप व्यक्त करत डीन डॉ. संगीता रावत यांना जाब विचारला होता. यासंदर्भात मंत्री लोढा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत रुग्णांच्या अनेक तक्रारींचा विचार करण्यात आला. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त बिपिन शर्मा, उपायुक्त शरद उघडे, वैद्यकीय संचालक डॉ. नीलम अंद्राडे, केईएमच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत उपस्थित होते.




बैठकीत केईएम रुग्णालयातील अनेक तक्रारींवर चर्चा करण्यात आली. उंदरांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणार, रुग्णालयात सिलिंग, डक्ट इत्यादींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, तसेच सर्व ड्रेनेज पाईप्सना उंदीर रक्षक पत्रे लावले जातील. रुग्णालयातील अन्न वाया जाऊ नये यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत, अशी माहिती आमदार अमित साटम यांनी दिली.

**लोढा, साटम यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले**

बैठकीत औषधांच्या टंचाईबाबतही चर्चा करण्यात आली. यावर मंत्री लोढा आणि भाजप मुंबई अध्यक्ष साटम यांनी अधिकाऱ्यांना पुन्हा धारेवर धरले. या चर्चेदरम्यान पुढील दोन वर्षे आवश्यक औषधांचा साठा करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर स्टॉक करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

# मुंबईला आंतरराष्ट्रीय शहर बनवायचे असेल तर... झोपडपट्ट्यांबाबत काय म्हणाले कोर्ट?

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की जर मुंबईला आंतरराष्ट्रीय शहर म्हणून विकसित करायचे असेल तर सरकार तसेच त्यांच्या संस्थांनी २०११ नंतर बांधलेल्या बेकायदेशीर झोपडपट्ट्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

संबंधित प्रकरण महाराष्ट्र झोपडपट्टी कायदा, 1971 च्या पुनरावलोकनाशी संबंधित आहे. 30 जुलै २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला स्वतःहून या कायद्याचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. कारण अनेक झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित होते. समोर आलेल्या अहवालांनुसार, झोपडपट्टी कायद्याअंतर्गत 1600 हून अधिक प्रकरणे सध्या उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. न्यायालयाने असे म्हटले की अशा प्रकरणांचे निराकरण करणे तसेच बेकायदेशीर झोपडपट्ट्यांवर कठोर कारवाई करणे हे शहरातील संतुलित विकास आणि नागरी सुविधांच्या विस्ताराकडे पहिले पाऊल असू शकते.



मुंबई उच्च न्यायालयाने पुढे सांगितले की, सरकारने या दिशेने प्रगतीशील दृष्टिकोन बाळगला पाहिजे. कारण झोपडपट्ट्यांचा बेकायदेशीर विस्तार शहराच्या विकासात मोठा अडथळा ठरत आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने तोंडी टिप्पणी केली की मुंबईतील झोपडपट्ट्या इतक्या एकमेकांशी जोडल्या गेल्या आहेत की एखादा परिसर पूर्णपणे झोपडपट्ट्यांनी कधी भरतो हे सांगणे कठीण आहे.

बुधवारी (१२ नोव्हेंबर) न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने काही महत्त्वाच्या सूचना देखील दिल्या आहेत. पुनर्वसनासाठी खोटी कागदपत्रे देणाऱ्या झोपडीधारकांवर गुन्हा दाखल करा, तसेच बिल्डरची नियुक्ती लॉटरीनेच करा, जेणेकरून कोणा एकाची मक्तेदारी राहणार नाही, अशा प्रकारच्या सुचना न्यायालयाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला केल्या आहेत.

पुनर्वसनासाठी झोपडीधारकाकडे आधारकार्ड, वीज बिल आणि अन्य कागदपत्रे असणे बंधनकारक आहे. झोपडीधारक सर्रासपणे खोटी कागदपत्रे सादर करतात. एसआरए त्यांनाच फक्त अपात्र ठरवते. पुढे काहीच कारवाई होत नाही. अशा झोपडीधारकांवर गुन्हेच दाखल झाले पाहिजेत, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

**सरकारने दिली ही माहिती**

मानखुर्द परिसराचे उदाहरण देत मुंबई उच्च न्यायालयाने विचारले की, २०११ च्या झोपडपट्टी संरक्षणाच्या अंतिम मुदतीनंतर बांधलेल्या बेकायदेशीर बांधकामांवर सरकारने काय कारवाई केली? सरकारच्या वकिलांनी यावेळी सांगितले की, २०११ नंतर बांधलेल्या झोपडपट्ट्यांना कोणतेही संरक्षण मिळालेले नाही.

न्यायालयाने स्पष्ट केले की जर सरकारला खरोखरच मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवायचे असेल तर झोपडपट्टी विस्तार नियंत्रित करण्यासाठी ठोस पावले उचलावी लागतील. मुंबईत वॉर्डनिहाय सर्वेक्षण करून २०११ नंतरच्या झोपड्या तोडायलाच हव्यात, असेही खंडपीठाने नमूद केले.

# नवी मुंबईत निवडणुका अद्याप जाहीर नाहीत, तरीही गाड्यांवर मनपाचा लोगो

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचे पडघम वाजत असताना नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरक्षण सोडतीसाठी वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात इच्छुकांची प्रचंड गर्दी उसळली. मात्र या गदीसीबतच बेशिस्त पार्किंग, नियमबाह्य वागणूक आणि वाहतूक पोलिसांची निष्क्रियता असे चिंताजनक चित्रही समोर आले. निवडणुका अधिकृतपणे घोषित झाल्याही नाहीत, तरी काही इच्छुकांच्या गाड्यांवर मनपाचा लोगो आणि 'नगरसेवक/नगरसेविका' अशी स्टिकर्स झळकत असल्याचेही आढळून आले.

**निवडणुका नाहीत, तरीही 'नगरसेवक' स्टिकर्स**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका २०१५ नंतर झालेल्या नाहीत. २०२० ते २०२५ दरम्यान करोना तसेच ओबीसी आरक्षणाच्या निर्णयामुळे निवडणुका स्थगित राहिल्या. त्यामुळे सध्या संपूर्ण शहराचे प्रशासन प्रशासकांकडे असून कोणताही अधिकृत नगरसेवक अस्तित्वात नाही.



तरीही आरक्षण सोडतीच्या ठिकाणी अनेक गाड्यांवर मनपाचा लोगो आणि 'नगरसेवक/नगरसेविका' अशी स्टिकर्स झळकट असल्याचे दिसून आले. यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

दरम्यान, इच्छुकांनी रस्त्यावर, पदपथांवर पार्किंग करण्याऐवजी हाकेच्या अंतरावर असलेल्या सेक्टर १६ येथील गटारावर हेवी स्लॅब टाकून तयार केलेल्या अधिकृत पार्किंगचा वापर करण्याची तसदीही घेतली नाही.

विष्णुदास भावे नाट्यगृहात विभागनिहाय आरक्षण सोडत होत असल्याने शहरातील माजी नगरसेवक, इच्छुक उमेदवार आणि पक्षांच्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. नाट्यगृहाच्या पार्किंगची सोय अल्प असल्याने मोठ्या संख्येने आलेल्या वाहनचालकांनी थेट रस्त्यावर, बस थांब्यावर आणि पदपथांवर दुहेरी-तिहेरी रांगेत वाहने पार्क केली.

यामुळे वाशी-कोपरखैराणे या शहरातील सर्वाधिक गर्दीच्या महामार्गावर सकाळी साडेनऊपासून दुपारी दीडपर्यंत प्रचंड वाहतूककोंडी झाली. जवळील सिग्नल सुटताच वाहतूककोंडी तीव्र होत असल्याचे दृश्य सातत्याने पाहायला मिळाले.

गर्दी मोठी होणार हे माहिती असूनही वाहतूक पोलिसांपैकी एकाही अधिकाऱ्याने कारवाई तर दूरच, नियमभंग करणाऱ्यांना हटकण्याचाही प्रयत्न केला नाही, अशी नाराजी ज्येष्ठ नागरिक अरविंद झा यांनी व्यक्त केली. "अशा बेशिस्त वागणुकीने वाहतूककोंडी वाढवणाऱ्यांच्या हातात शहर द्यायचे का?" असा सवाल निवृत्त प्राध्यापिका अरुणा लातूरकर यांनी उपस्थित केला.

# आयकर अधिकारी असल्याचे सांगून एका महिलेला लाखो रुपयांचा गंडा

■बोईसर। प्रतिनिधी,

आयकर अधिकारी असल्याची बतावणी करून आपल्या साथीदारांसह घरात धाड टाकत एका महिलेला लाखो रुपयांचा गंडा घालणाऱ्या तोतया आयकर अधिकाऱ्याला अटक करण्यात बोईसर पोलिसांना यश आले. याप्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून काही फरार आरोपींचा पोलिसांमार्फत शोध सुरू आहे.

बोईसर जवळील मान येथे राहणाऱ्या एका व्यक्तीच्या घरात लाखो रुपयांची रोख रक्कम असल्याची माहिती आरोपीला त्याच्या साथीदारामार्फत मिळाली होती. त्यानुसार प्रमुख आरोपी फैयाज काझी उर्फ मनीष पावसकर व त्याच्या साथीदारांनी घरामध्ये महिलेचा पती नसल्याची संधी साधत पत्नी व मुले यांना आपण आयकर विभागाचे अधिकारी असल्याची बतावणी केली. तुमच्या घरात गैरमार्गाने मिळवलेली मोठ्या प्रमाणात बेहिशोबी रोकड असल्याची भीती दाखवली तसेच आयकर विभागाचे बनावट ओळखपत्र दाखवून महिलेचा मोबाईल आपल्या ताब्यात घेतला. आरोपींनी आयकर विभागाची धाड पडल्याचे सांगत फिर्यादीच्या घरातील कपाटात असलेले ५५ लाख ८० हजार रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला. तोतया आयकर अधिकारी फय्याज कादर काझी उर्फ मनीष पावसकर हा मूळचा रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथे राहणारा असून पोलिसांनी या प्रमुख आरोपीला अटक करण्यात यश मिळवले आहे. आरोपीकडून २३ लाख ७० हजारांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात प्रमुख आरोपीचे इतर साथीदार हे फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.





या प्रकरणी महिलेने बोईसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, सहाय्यक पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक यांनी तपासा बाबत मार्गदर्शन केले पोलीस निरीक्षक सुनील जाधव यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक केशव राठोड, उपनिरीक्षक चंद्रकांत हाके यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून बोईसर चिल्हार रस्ता, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग, मनोरवाडा भिवंडी महामार्ग परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण आणि तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू केला.

# बेस्टमध्ये चोरी करणाऱ्या रेकॉर्डवरील आरोपीस अटक



■मुंबई। प्रतिनिधी,

बेस्ट बसमध्ये चोरी करर्णाया सुरेश बाबू पवार नावाच्या एका रेकॉर्डवरील आरोपीस समतानगर पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून चोरीचे एक लाखांचे दागिने जप्त करण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध अशाच प्रकारच्या दहा गुन्ह्यांची नोंद असल्याचे पोलिसांनी सांगितले. अटकेनंतर त्याला बोरिवलीतील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते. यातील तक्रारदार महिला कांदिवली परिसरात राहते. ९ नोव्हेंबर ती कांदिवली-विक्रोळी असा बसने प्रवास करत होती. यावेळी अज्ञात व्यक्तीने तिच्या पर्समधून सोन्या-चांदीचे दागिने आणि कॅश असा एक लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी करुन पलायन केले होते. हा प्रकार नंतर तिच्या लक्षात येताच तिने समतानगर पोलिसांना घडलेला प्रकार सांगून अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार केली होती.

**चोरीचे दागिने जप्त**

**आरोपीविरुद्ध दहा गुन्हे दाखल**

चौकशीत त्यानेच ही चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून पोलिसांनी चोरीचे दोन्ही मंगळसूत्र, चांदीचे दागिने असा एक लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तपासात सुरेश हा मालाडच्या कुरार व्हिलेज, अप्पापाडा, सावित्रीबाई फुले नगरात राहतो. तो रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध अशाच प्रकारच्या दहाहून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. यातील बहुतांश गुन्ह्यांत त्याला पोलिसांनी अटक केली होती. मात्र जामिनावर बाहेर आल्यानंतर तो गदीर्चा फायदा घेऊन बेस्टमध्ये प्रवासादरम्यान चोरी करुन पलायन करत होता.

याप्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयवंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजीतसिंग राजपूत, एपीआय योगेश राऊत, उपनिरीक्षक राहुल वाळुंजकर, पोलीस अंमलदार किरणी, निजाई, जाधव, शिंदे यांनी तपास सुरु केला होता. परिसरातील सीसीटिव्ही फुटेजसह तांत्रिक माहितीवरुन पोलिसांनी मालाड येथून सुरेश पवार याला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते.

# गांजा तस्करीप्रकरणी दोघांना कारावासाची शिक्षा... ३ वर्षांत खटल्याची सुनावणी पूर्ण करुन निकाल

■मुंबई। प्रतिनिधी,

गांजा तस्करीप्रकरणी दोघांना विशेष सत्र न्यायालयाने कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तीन वर्षांत खटल्याची सुनावणी पूर्ण करुन न्यायालयाने हा निकाल दिला आहे. इस्माईल सलीम शेख आणि इम्रान अबरार हुसैन अन्सारी अशी या दोघांची नावे असून त्यांना गांजा तस्करीप्रकरणी पंधरा वर्षांचा कारावास तसेच दिड लाखांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. जानेवारी २०२२ रोजी कांदिवली युनिटच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने घाटकोर बस डेपोजवळ साध्या वेशात पाळत ठेवून दोन संशयितांना ताब्यात घेतले होते.

यावेळी त्यांच्याकडून पोलिसांनी २८ लाख ७५ हजाराचा गांजा आणि पाच लाखांची एक कार असा ३३ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. याच गुन्ह्यांत इस्माईल शेख आणि इम्रान अन्सारी या दोघांना पोलिसांनी अटक केली होती. त्यांच्या चौकशीनंतर ऑक्टोंबर २०२२ रोजी याच गुन्ह्यांत




अल्ताफ मुल्का शेख आणि चक्रापाणी भल्लू गोंडा या दोघांना पोलिसांनी अटक केली होती. यातील अल्ताफ हा व्यावसायिक असून अंधेरीतील साकिनाका तर चक्रापाणी हा मूळचा ओरिसाचा रहिवाशी असून शेतकरी म्हणून काम करत असल्याचे उघडकीस आले होते.

त्यांच्याविरुद्ध नंतर विशेष सत्र न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात आले होते. या खटल्याची नियमित सुनावणी सुरु होती. या खटल्याची सुनावणी अलीकडेच पूर्ण झाली आणि न्यायालयाने इम्रान आणि इस्माईलला दोषी ठरविले होते. मंगळवारी ११ नोव्हेंबरला या दोघांना न्यायालयाने गांजा तस्करीप्रकरणी पंधरा वर्षांच्या कारावासासह दिड लाखांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.

या गुन्ह्यांचा न्यायालयीन कामकाज वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक रुपेश नाईक, तपास अधिकारी एपीआय संजय खंडागळे, पोलीस हवालदार महेश चौधरी यांनी केले तर कोर्ट पैरवी म्हणून सहाय्यक फौजदार सिद्धेश्वर पाटील, विल्फ्रेड मवाडो, पोलीस हवालदार भरत मोहिते यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

# माझगाव विशेष सत्र न्यायालयाच्या लिपीकास लाचप्रकरणी अटक... सत्र न्यायाधिशांना सहआरोपी दाखवण्यात आले

■मुंबई। प्रतिनिधी,

केसचा निकाल बाजूने पारित करण्यासाठी २५ लाखांची मागणी करुन १५ लाखांची लाच घेतल्याप्रकरणी माझगाव येथील विशेष सत्र न्यायालयाच्या कोर्ट क्रमांक चौदाचे लिपीक चंद्रकात हनमंत वासुदेव यांना मंगळवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली. अटकेनंतर त्यांना विशेष सत्र न्यायालयाने १६ नोव्हेबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याच गुन्ह्यांत अतिरिक्त सत्र न्यायाधिश एजाजुद्दीन सल्लाउद्दीन काझी यांना सहआरोपी दाखविण्यात आले आहे. त्यांची लवकरच संबंधित अधिर्कायांकडून चौकशी होणार आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधिशांवरच लाचप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने न्यायालयीन कर्मर्चायांमध्ये एकच खळबळ उडाली होती. तक्रारदार तक्रारदार व्यावसायिक असून त्यांच्या पत्नीच्या जागेवर अनधिकृतपणे कब्जा करण्यात आला होता. त्यामुळे त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र या याचिकेतील रक्कम दहा कोटीपेक्षा कमी असल्याने त्याची याचिका माझगाव येथील विशेष सत्र न्यायालयात वर्ग करण्यात आला होता.




या याचिकेवर अतिरिक्त सत्र न्यायाधिश एजाजुद्दीन काझी यांच्या न्यायालयात सुनावणी सुरु होती. याच सुनावणीसाठी तक्रारदार ९ सप्टेंबरला उपस्थित होते. यावेळी त्यांना न्यायालयाचे लिपीक चंद्रकांत वासुदेव यांनी कॉल करुन भेटण्यास सांगितले होते. त्यामुळे १२ सप्टेंबरला ते चंद्रकातला त्यांच्या न्यायालयीन चेबर्समध्ये भेटले होते. यावेळी त्याने त्यांच्याकडून केसचा निकाल त्यांच्या बाजूने पारित करण्यासाठी २५ लाखांची मागणी केली होती. मात्र ही रक्कम जास्त असल्याने त्यांनी त्यास नकार दिला होता. त्यानंतर चंद्रकांत ते त्यांना सतत कॉल करुन विचारणा करत होते. लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी त्यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार केली होती. १० नोव्हेबरला ही तक्रार प्राप्त होताच या अधिर्कायांनी त्याच दिवशी तक्रारीची शहानिशा केली होती. यावेळी चंद्रकांत यांनी केसचा निकाल बाजूने पारित करण्यासाठी २५ लाखांची मागणी करुन तडजोडीनंतर पंधरा लाख रुपये देण्यास सांगितले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी या अधिर्कायांनी तक्रारदारांना लाचेची रक्कम देऊन पाठवून दिले होते.

ठरल्याप्रमाणे तक्रारदारांनी पंधरा लाख रुपये तक्रारदारांना दिले होते. त्यानंतर त्यांनी अतिरिक्त सत्र न्यायाधिश एजाजुद्दीन काझी यांना कॉलवरुन पैसे मिळाल्याचे सांगितले होते. त्यांनीही त्यास संमती दर्शविली होती. या घटनेनंतर चंद्रकांत यांना लाचेच्या रक्कमेसह या अधिर्कायांनी रंगेहाथ पकडले होते. याप्रकरणी त्याच्यासह एजाजुद्दीन काझी यांच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्यांत अटक केलेल्या चंद्रकांत वासुदेव यांना बुधवारी दुपारी विशेष सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याच गुन्ह्यांत एजाजुद्दीन काझी यांना पाहिजे आरोपी दाखविण्यात आले असून त्यांची लवकरच या अधिर्कायांकडून चौकशी होणार आहे. केस निकाल बाजूने देण्यासाठी न्यायाधिशांच्या वतीने लिपीकालाच पंधरा लाखांची लाच घेताना अटक करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली होती. चालू वर्षांतील ही आतापर्यंत सर्वांत मोठी कारवाई असल्याचे बोलले जाते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com